# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ९ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


## आक्षीत मच्छिमार बोट बुडाली

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील आक्षी साखर येथील मासेमारी करण्यासाठी गेलेली बोट बुडाल्याची घटना मंगळवारी (दि.७) घडली. या अपघातात बोटीचे नुकसान झाले असून सर्व १५ खलाशी सुखरुप आहेत. साखर येथील जगदीश बामजी यांची मच्छिमार बोट मंगळवारी मासेमारीसाठी समुद्रात गेली होती. मच्छिमारी करत असताना पहाटे बोटीला अचानक गळती लागली. त्यामुळे बोटीत पाणी भरु लागले आणि बोट हळूहळु पाण्यात बुडू लागली. प्रसंगावधान दाखवत बोटीतील खलाशांनी इतर बोटीच्या खलाशांकडे संपर्क साधत सुखरुप किनारा गाठला. बुडालेल्या बोटीला दुसऱ्या बोटीने खेचत साखर किनाऱ्यावर आणण्यात आले आहे. बोटीचे सुमारे १२ लाखांचे नुकसान झाले असल्याची माहिती मच्छिमार नाखवांनी सांगितली आहे.

## पिकअपच्या धडकेत तरुणीचा मृत्यू

**छ.संभाजीनगर :** वैजापूर शहरात भरधाव पिकअपने दिलेल्या धडकेत एक १५ वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. श्रेया हरिश्चंद्र दुसाने असे घटनेतील मयत मुलीचे नाव आहे. श्रेया ही सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आनंदनगर येथून शिवप्रतापनगर येथे ट्युशनसाठी जात असताना म्हसोबा चौक परिसरात रास्ता ओलांडत असताना भरधाव पिकअपने तिच्या सायकलला धडक दिली. या अपघातात ती गंभीर जखमी झाली. तिला उपस्थित नागरिकांनी तातडीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकारी यांनी तिला तपासून मृत घोषित केले.

# रोहा हादरला! ११ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार



**। रोहा । वार्ताहर ।**

एका ११ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना रोहे शहरापासून जवळ असलेल्या वरसे गावात घडली. या घटनेनंतर सर्वत्र संपताची लाट पसरली असून या घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, म्हणून ग्रामस्थांनी मंगळवारी (दि.७) रात्री रोहा पोलीस ठाण्यात जमा होऊन हल्लाबोल करत

### खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविणार, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे आश्वासन

आपला संताप व्यक्त केला. पोलिसांनी तात्काळ मुख्य आरोपी व आरोपीला सहकार्य करणाऱ्या त्याच्या दोन भावांना अटक केली आहे.

दरम्यान, बुधवारी सकाळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पीडित मुलीच्या घरी भेट देत घटनेबद्दल अधिक माहिती जाणून घेतली. तसेच



हा खटला फास्ट ट्रॅकवर चालवून आरोपीला कठोर शिक्षा होईल, यासाठी नक्कीच प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. तर दुसरीकडे जिल्हा पोलीस अधीक्षक गावात आल्याची माहिती समजताच ग्रामस्थ वर्ग विशेषतः महिलांनी उपस्थित राहून आरोपीला गोळ्या घालून मारा, अशी मागणी

### ■ विकृतीला ठेचून काढा

**या घटनेनंतर वरसे गावात तणावाचे वातावरण पसरले आहे. आरोपी हा विकृत पद्धतीने नेहमी वागत असल्यामुळे त्याचा बदलापूर घटनेप्रमाणे इनकाउंटर करून या विकृतीला ठेचून काढा, अशी मागणी गावातील संतप्त महिलांनी पोलीस अधीक्षकांसमोर केली.**

करत बदलापूर घटनेची माहिती करून देत आपला संताप व्यक्त केला.

या घटनेतील तेजस गणेश पडवळ (३०, रा.

•➤ पान २ वर

> “ ही घटना निंदनीय असून तुम्ही विचलित होऊ नका. या घटनेतीला आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, याकरिता सर्व साक्षी पुरावे गोळा करून न्यायालयात तातडीने दोषारोपपत्र दाखल करून सदर खटला फास्ट ट्रॅकवर चालवून आरोपीला लवकरात लवकर कठोर शिक्षा होईल अशा पद्धतीने पोलीस प्रशासन गतिमान पद्धतीने काम करेल. येथील उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक व ग्रामस्थ तुमच्या सोबत आहेत आणि पोलीस प्रशासन तुम्हाला नक्कीच सहकार्य करेल.
> – सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड ”

## वेधक

### अपघातात मायलेकाचा मृत्यू

**कल्याण :** कल्याणच्या आग्रा रोड रस्त्यावर श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिर चौकामध्ये भरधाव डंपरने रस्ता क्रॉस करणाऱ्या मायलेकाला जोरदार धडक दिली. या धडकेत एक महिला आणि तिच्या तीन वर्षाच्या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि.८) घडली. शाळेतून घरी जात असताना रस्ता क्रॉसिंगच्या वेळी डंपरने मायलेकाला उडवले. महापालिकेच्या कचरा उचलणाऱ्या डंपरने ही धडक दिली. डंपर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या अपघातानंतर पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे. महिला आपल्या मुलासह रस्ता ओलांडत असताना हा अपघात घडला. निशा सोमेसकर आणि अंश सोमेसकर असे मृत आई आणि मुलाचे नाव आहे.

### मुंबईत चिमुकलीला एचएमपीव्हीची लागण

**मुंबई :** चीनमध्ये कहर करणाऱ्या एचएमपीव्ही व्हायरसची प्रकरणं आता भारतातही दिसू लागली आहेत. मुंबईत पहिला रुग्ण आढळला आहे. एका ६ महिन्यांच्या मुलीला या व्हायरसची लागण झाल्याचे समोर आले आहे. या चिमुकलीला उपचारासाठी हिरानंदानी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मुलगी १ जानेवारीपासून रुग्णालयात दाखल होती. मात्र आता उपचारानंतर तिला घरी सोडण्यात आले आहे. ह्युमन मेटापन्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा श्वासोच्छवासाच्या आजारांना कारणीभूत ठरणारा व्हायरस म्हणून ओळखला जातो. कर्नाटकात एचएमपीव्हीची दोन प्रकरणं नोंदवली गेली असताना मुंबईत ६ महिन्यांच्या मुलीला व्हायरसची लागण झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

# तेजीत मटका, ‘खाकी’वर ठपका

**जिल्ह्यात ५६ ठिकाणी मटक्यांच्या टपऱ्या; काशिनाथ ठाकूरांचा आरोप**

**। अलिबाग । कृषीवल टीम ।**

रायगड जिल्ह्यात काही कालावधीसाठी बंद झालेला मटका पुन्हा डोके वर काढत आहे. कारवाईचा धाक कमी झाल्याने चोरी-छुपे ओपन-क्लोजचा खेळ पुन्हा तेजीत येत आहे. तरुण पिढी मटक्याच्या नादी लागून बरबाद होत असतानाही लोकप्रतिनिधी या गंभीर प्रकाराकडे लक्ष देत नसल्याचे चित्र आहे. आकडेमोड करणाऱ्या पाट्या खुलेआम झळकू लागल्या आहेत. अवैध व्यवसाय खुलेआम सुरू आहेत. यासाठी पोलीस विभाग जबाबदार असल्याचा आरोप ॲड. काशिनाथ ठाकूर यांनी केला आहे. अनेकदा तक्रारी तसेच पुरावे देऊनही कारवाई होत नसल्यामुळे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीच त्यांनी आझाद मैदान येथे उपोषणास बसणार असल्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

> “ **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणीवपूर्वक लक्ष देत तातडीने अवैध धंद्यांवर कारवाई करुन ते बंद करावेत. अन्यथा २६ जानेवारी रोजी न्याय मागणीसाठी आमरण उपोषणास बसणार आहे. त्यानंतर होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, पोलीस महानिरीक्षक तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांची राहील. – ॲड. काशिनाथ ठाकूर,** सामाजिक कार्यकर्ते ”

याबाबतचे निवेदन ठाकूर यांनी मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, कोकण आयुक्त, रायगडचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आदींना दिले आहे. ठाकूर यांच्या सांगण्यानूसार

•➤ पान २ वर




# आजपासून रंगणार शेकाप पुरस्कृत क्रिकेटचा थरार

**नव्या २०२५ या वर्षात खेळाडूंसाठी हक्काचे व्यासपिठ**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या संकल्पनेतून शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबागच्यावतीने अलिबाग चॅम्पियन ट्रॉफी २०२५ नाईट टेनिस क्रिकेट लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. गुरुवारी (दि.०९) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास स्पर्धेचा उद्घाटन सोहळा अलिबाग शहरातील क्रीडाभवन येथील मैदानात होणार आहे. नाईट क्रिकेट स्पर्धेचा थरार तीन दिवस पाहण्याची संधी क्रिडा प्रेमींना मिळणार आहे.

जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील क्रीडा प्रेमींना आयपीएलच्या धर्तीवर क्रिकेटा आनंद घरबसल्यादेखील घेता येणार आहे. स्पर्धेचे दुसरे पर्व असणार आहे. साखरमधील प्रदिप



स्पोर्ट्स, अलिबागमधील कुबेर इलेव्हन, अलिबागमधील यु.व्ही. स्पोर्ट्स, अलिबागमधील आर्यन स्ट्रायकर्स, अलिबागमधील फैझी इलेव्हन, नवगांवमधील रियांश इलेव्हन, वरसोली येथील त्रिश्राव्या इलेव्हन, आंबेपूरमधील एस.पी. सुपर प्लेअर्स, म्हात्रोळी येथील आद्य सप्लाअर्स, थळमधील एम.डी. वॉरिअर्स, नागाव येथील सियावॉरिअर्स, साखरमधील नाखवा वॉटर स्पोर्टस्, अलिबागमधील ए.बी. ग्रुप, साखरमधील प्रफुल्ल ॲन्ड

•➤ पान २ वर

### घरबसल्या स्पर्धा बघण्याची संधी

**स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला दोन लाख रुपये, व चषक, द्वितीय क्रमांकाला एक लाख रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेतील मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे. ही स्पर्धा प्रो लिंक स्पोर्ट्स व एफएच स्पोर्ट्सवरदेखील घरबसल्या पहाता येणार आहे.**

> “ **अलिबागमधील क्रिकेट खेळाडूंना हक्काचे व्यासपिठ मिळावे यासाठी गतवर्षापासून अलिबाग चॅम्पीयन ट्रॉफी नाईट टेनिस क्रिकेट लीग क्रिकेट स्पर्धा सुरू केली आहे. या स्पर्धेचे हे दुसरे पर्व आहे. तयारी पूर्ण झाली असून त्याठिकाणी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. समिती गठीत करण्यात आली असून समितीचे सदस्य आपली जबाबदारी पार पाडत आहेत. पुढील तीन दिवसदेखील चांगल्या पध्दतीने जबाबदारी पार पाडतील असा विश्वास आहे. तरी क्रीडा प्रेमींनी स्पर्धेला उपस्थित राहून आम्हा सर्वांचा उत्साह वाढवावा.**
> **– प्रशांत नाईक,** माजी नगराध्यक्ष ”

# शाळेत मराठी बंधनकारक

**■ राज्य सरकारने घेतला मोठा निर्णय**

**■ इंग्रजी शाळांवर होणार कारवाई**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गेल्या काही वर्षांपासून अनेक इंग्रजी माध्यमांच्या तसेच विविध बोर्डाच्या शाळांकडून मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ केली जात होती. तसेच नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मराठी हा विषय पर्यायी करण्यात आल्याची चर्चा रंगली होती. आता शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मराठी अनिवार्यच अशी भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असणार आहे, अशी माहिती दादा भुसे यांनी दिली आहे.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शालेय शिक्षण विभागाबद्दल काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यात त्यांनी शिक्षण विभागाची पुढील वाटचाल कशी असेल, त्यासाठी काय करावे लागेल याबद्दल विविध घटकांची चर्चा करत असल्याचे सांगितले आहे. शालेय

•➤ पान २ वर

### शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

**‘केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य आहे. यातून त्यांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही. याबरोबरच मराठी भाषेच्या अध्यापनाला अधिकाधिक व्यापक करण्यासाठी त्या शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान असायलाच हवे’, अशी सूचना दादा भुसे यांनी दिली आहे.**

## कुंभमेळाव्याच्या सुरक्षेसाठी
# आयटीयूएस मरीनची निवड



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये १३ जानेवारी २०२५ रोजीपासून सुरू होणारा महाकुंभ मेळ्यासाठी ४० कोटी भाविक संगमावर पवित्र स्नानासाठी येणार आहेत. हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक समारंभांपैकी एक असणार आहे. त्यामुळे हा सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी उत्तर प्रदेश दहशतवादविरोधी पथकाने कुंभमेळा २०२५ साठी बचाव पथके आणि उभयचर बोटी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचा करार केला आहे. ज्यामध्ये आयटीयूएस मरीनचादेखील समावेश आहे.

ही बोट पाण्यावर आणि जमिनीवरही चालते. या कराराअंतर्गत, आयटीयूएस मरीन उत्तर प्रदेश एटीएसला उभयचर बोटी आणि प्रशिक्षित बचाव पथके उपलब्ध करून देईल. ज्यामुळे गंगा नदीच्या काठावर आयोजित कार्यक्रमामध्ये

•➤ पान २ वर

# शहिद सुयोग कांबळे यांना मानवंदना

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारतीय सैन्य दलातील शहिद सुयोग अशोक कांबळे यांना रविवारी (दि.१२) शासकीय इतमामात नारंगीमध्ये मानवंदना दिली जाणार आहे.



अलिबाग तालुक्यातील नारंगी बौध्दवाडी येथील रहिवासी असणारे सुयोग कांबळे गेल्या अनेक वर्षापासून भारतीय सैन्य दलात कार्यरत होते. त्यांनी सैन्यदलात १८ वर्षे सेवा केली होती. ४ ऑक्टोबर २०२३ मध्ये सिक्कीम येथे कर्तव्य बजावत असताना अचानक धरणातील बंधारा फुटला. त्या पाण्यामध्ये त्याची संपूर्ण तुकडी वाहून गेली. अनेकजण गाढले गेले. या घटनेनंतर सिक्कीममधील सरकारमार्फत त्यांचा शोध घेण्यात आला. परंतु ते सापडले नाहीत. त्यामुळे त्यांना सैन्य दलाकडून शहिद घोषित करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर नारंगीपर्यंत अंत्ययात्रा पायी काढण्यात येणार आहे. रविवारी (दि.१२) जानेवारीला सकाळी १० ते ११ या वेळेत रॅली निघणार आहे. भारतीय सैन्य दलाकडून त्यांना शासकीय इतमामात मानवंदना दिली जाणार आहे.

**वरसोली आणि मुळगांव किनारी उपक्रम | गस्ती नौकांना होणार फायदा**

# आता अवैध मासेमारीवर ड्रोनची नजर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कोकणातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी अत्याधुनिक ड्रोन प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. रायगडसह कोकणातील सात जिल्ह्यातील सागरी किनारी सात ड्रोन कंट्रोल नियंत्रण कक्षामार्फत नऊ अत्याधुनिक ड्रोनची नजर राहणार आहे. अशा पध्दतीची आधुनिक यंत्रणा प्रथम अंमलात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील वरसोली समुद्रकिनाऱ्याकडील क्रिकेट मैदान व श्रीवर्धन तालुक्यातील मुळगांव बंदर येथून ड्रोन प्रणालीचे उड्डाण करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संजय पाटील यांनी दिली. आहे.

महाराष्ट्र राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारीत २०२१) हा कायदा अंमलात आला आहे. या सागरी मासेमारी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता विभागाकडे



### सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी ठरणार फायदेशीर

**अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांची पुराव्यासह माहिती विभागास उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. अशा नौकांवर सागरी कायद्याअंतर्गत कठोरपणे कारवाई करणे सोईचे होईल. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळेस अधिकचे क्षेत्र ड्रोनद्वारे देखरेखीखाली येण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वापर करुन मासेमारी नौकांची करुन झाल्यावर अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती विभागास सुलभरित्या उपलब्ध होवू शकेल, ड्रोनद्वारे राज्याच्या किनारपट्टीवरील क्षेत्र देखरेखीखाली येणार असुन उक्त वापरण्यात येणारे ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधुन वापरण्यात येणार आहेत, जेणे करुन सागरी सुरक्षा बळकट होण्यास सुध्दा मदत होईल.**

असलेल्या गस्ती नौकांमार्फत गस्त घालून कार्यवाही करण्यात येत असते. गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करणे शक्य होत नाही. तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करीत असताना त्या पळून जात असतात. अशा नौकांना पकडणे जिकरीचे होत असते.

अनधिकृत मासेमारीवर आळा घालून शाश्वत मासेमारी टिकून ठेवण्याच्या दृष्टीने,

•➤ पान २ वर




# तोतया आयकर अधिकारी जाळ्यात

## तळोजामध्ये अटक, अनेक आयकार्ड, बनावट शिक्के, कागदपत्रे जप्त

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

बीकेसी आयकर विभागात काम करणारा कंत्राटी चालकच बनावट आयकर अधिकारी म्हणून वावरत होता. या बनावट आयकर अधिकाऱ्याला मंगळवारी (दि.७) गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी तळोज्यातून अटक केली आहे. आरोपीकडे अनेक आयकार्ड, बनावट शिक्के, नियुक्तीपत्रे व इतर कागदपत्रे सापडली आहेत. या आरोपीने किती लोकांना आयकर विभागात नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली आहे, याचा तपास सुरू असल्याची माहिती गुन्हे विभागाचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. तसेच आरोपीला वसई न्यायालयात हजर केल्यावर ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

संतोष भवनच्या तांडापाडा येथील अजमेरी बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या सफारुद्दीन खान यांच्या मुलीला आयकर विभागाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १५ लाख रुपयांची फसवणूक केली होती. आरोपी रिंकू शर्मा व अंशु पासी या दोघांनी त्यांच्या मुलीला आयकर विभागात कामाला लावतो, असे सांगितले होते. त्यांच्या मुलीला आयकर विभागाचे ओळखपत्र व ट्रेनिंगचे पत्र देऊन तिला नोकरीला न लावता आर्थिक फसवणूक केली होती. पेल्हार पोलिसांनी १३ डिसेंबरला गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार करत होते.

तपासादरम्यान रिंकू शर्मा हा आरोपी तळोजात असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट तीनला मिळाली. आरोपीला पोलिसांनी मंगळवारी सापळा लावून ताब्यात घेतले. त्याची झडती घेतल्यावर २८ बनावट आयकर विभागाचे आयकार्ड, अनेक शिक्के, नियुक्तीपत्रे व इतर कागदपत्रे सापडली. आरोपी पकडल्याची माहिती मिळताच फसवणूक झालेल्या लोकांनी गुन्हे शाखेच्या कार्यालयात गर्दी केली होती. आतापर्यंत ४० ते ४२ नागरिकांसह सुशिक्षित बेरोजगार तरुण, तरुणींना बनावट आयकर निरीक्षकाचे आयकार्ड व नियुक्ती पत्रे देऊन दोन कोटीपेक्षा अधिक रुपयांना गंडा घातला असल्याची माहिती समोर आली आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सपोनि सोपान पाटील, पोउपनिरी उमेश भागवत, सफौ. अशोक पाटील, पोहवा मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, सुनील पाटील, मनोहर तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, मसुब प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे तसेच सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी केली आहे.

# पतंगाचा मांजा पक्ष्यांच्या जीवावर

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

मकरसंक्रांतीला तळगुळाबरोबरच पतंगांचे वैशिष्ट्य मानले जाते. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील बाजारात पतंग विक्रीसाठी दाखल झाले असून पतंग खरेदीची लगबगही सुरु झाल्याचे दिसून येत आहे.

पतंग कापाकापीच्या स्पर्धेमध्ये आपण जिंकावे या उद्देशाने अनेक जण धारधार मांज्याचा वापर करतात. या धारधार मांज्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून अनेक पक्ष्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. पक्ष्यांना इजा पोहविण्याचा कोणाचाही उद्देश व हेतू नसतो, अगर कुणीही जाणूनबुजून करत नाही. परंतु स्पर्धेमध्ये आकाशात लांब गेलेल्या पतंगाच्या मांज्यामध्ये आकाशात भराऱ्या मारणारे पक्षी अडकून त्यांना इजा होण्याचा संभव असतो. मकर संक्रांत एक दिवसांची असली तरी पतंगबाजी महिनाभर चालते. पतंग मांजासह झाडांच्या फांद्यात अथवा विजेच्या तारांमध्ये राहिल्यामुळे त्याच्या संपर्कात आल्यास पक्षी आणि छोटे प्राणी यामुळे जीवाला मुकतात.

त्यामुळे पतंगांच्या हौशींनी धारधार मांज्या ऐवजी साध्या सुती धाग्याचा वापर करावा म्हणजे त्यांची हौस पक्षांच्या जीवावर बेतणार नाही, असे आवाहन पक्षी आणि पर्यावरणप्रेमींनी केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान श्री. दिलीप काशिनाथ पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि.रायगड.**

| अनु.नं. | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १) | १४२/२ | ०-७८-५० पो.ख. ०-०२-५० एकूण ०-८१-०० पैकी ० हे. ०-६४-०० आर, आकार १ रूपया १३ पैसे हि मिळकत | १.४४ |
| २) | १४२/३ | ०-७८-५० पो.ख. ०-०२-५० एकूण ०-८१-०० | १.४४ |
| ३) | १४३/१/अ/१ | ०-३२-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-३४-०० | ७.२५ |
| ४) | १४३/१/अ/३ | ०-१८-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१९-०० | ४.७५ |
| ५) | १४३/१/क | ०-१६-२० पो.ख. ०-००-५० एकूण ०-१६-७० | ४.०० |
| ६) | १४३/२ | ०-३९-५० पो.ख. ०-०५-०० एकूण ०-४४-५० | ७.७५ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०९/१/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.


# जिल्हाप्रशासनाविरोधात हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांची नाराजी

**। उरण । वार्ताहर ।**

प्रकल्पग्रस्त हनुमान कोळीवाडा गावाची अधिसूचना रद्द न करता पुनर्वसन करणाऱ्या जिल्हा प्रशासनाच्या लोकसेवकांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी रायगडच्या जिल्हा अधिकाऱ्यांकडे केली आहे. तसेच यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रालय सचिव, जिल्हाधिकारी, कोकण भवन, कोकण आयुक्त, पोलिस आयुक्त नवी मुंबई, प्रांत कार्यालय, तहसीलदार यांच्यासोबत याबाबत पत्रव्यवहारसुद्धा करण्यात आला आहे. शासनाने एनएसपीटी प्रकल्प विस्थापित हनुमान कोळीवाडा गावातील शेतकरी व बिगर शेतकरी असणाऱ्या २५६ कुटुंबांसाठी उरण येथील बोरीपाखाडी येथील १७.२८ हेक्टर जमिनीवर १२ नोव्हेंबर १९८२ ते १२ मार्च १९८७ मध्ये शासनाच्या मापदंडाने कागदोपत्री पुनर्वसन मंजूर केले होते. हे पुनर्वसन जिल्हाधिकारी यांनी आजतागायत केलेले नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या लोकसेवकांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेतर्फे केली आहे.

# पागोटे ते चौक मार्गामुळे मुंबई पुणे अतिजलद प्रवास

**। उरण । वार्ताहर ।**

मुंबई पुणे द्रुतगती मार्गाला जोडणाऱ्या प्रस्तावित उरणमधील जेएनपीए बंदरातील पागोटे ते चौक या ३० किलोमीटर लांबीच्या मार्गामुळे मुंबई पुणे मार्गातील जवळपास २० किलोमीटरचे अंतर कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मुंबई ते पुणे हा प्रवास अतिजलद गतीने होणार आहे.

३ हजार ३३६ कोटी रुपये खर्चाचा हा मार्ग जेएनपीए ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४८ ला जोडला जाणार आहे. जेएनपीए बंदरातील वाढत्या कंटेनर हाताळणीमुळे वाहन संख्येतही वाढ होणार आहे. त्यामुळे जेएनपीए मार्गावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून हा मार्ग उभारला जाणार आहे.

इकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणून संबोधण्यात येणारा हा मार्ग जेएनपीए बंदर खोपटे,एमएसआरडीसी, नैना आणि एनएमडीपी असा असणार आहे. भारत माला प्रायोजनेतून या मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे उरणचे आमदार महेश बालदी यांनी याची मागणी केली होती. त्यानंतर १९ जूनला या मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे.

### दोन बोगदे

या मार्गामुळे उरण तालुक्यातील बोरखार,धाकटी जुई,विंधणे,चिरनेर हा परिसर थेट मुंबई आणि पुणे या दोन शहरांशी जोडला जाणार आहे. अटलसेतूवरून चिर्ले पागोटे मार्गे पुणे असा प्रवास या मार्गाने करता येणार आहे. त्यामुळे मुंबई ते कोन या मार्गाऐवजी मुंबई ते चौक असा थेट प्रवास करता येणार आहे. या महत्त्वाकांक्षी मार्गावर दोन बोगदे आहेत. यात चिरनेर त्या पुढील भागात ही बोगदा तयार करण्यात येणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या माध्यमातून या मार्गाची निविदा प्रक्रिया सुरू असून अडीच वर्षांच्या कालावधीत हा मार्ग उभारणीचा प्रस्ताव आहे.
यशवंत घोटकर, एनएचआय अधिकारी

हा मार्ग उरण, पनवेल, खलापूर आणि कर्जत या रायगड जिल्ह्यातील चार तालुक्यातून जाणार आहे. त्यामुळे या परिसरातील अनेक गावे ही मुंबई पुण्याशी थेट जोडली जाणार आहेत. रायगड जिल्ह्यातील हा परिसर आदिवासी व ग्रामीण आहे. त्यामुळे येथील नागरिकांना ही दळणवळणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पान १ वरून

## आजपासून रंगणार शेकाप पुरस्कृत क्रिकेटचा थरार

निलेश स्पोर्ट्स, अलिबागमधील जे.डी. भार्गवी इलेव्हन, दिघोडीमधील अर्जून इलेव्हन या सोहळा संघाचा समावेश असणार आहे.

अलिबागमध्ये क्रीडाभवन येथे नऊ ते अकरा जानेवारी अशी तीन दिवस नाईट क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. अलिबाग तालुका मर्यादीत या स्पर्धा होणार आहेत.

गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास नाईट क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होणार आहे. प्रेक्षणीय सामना अलिबाग प्रेस असोसिएशन आणि ॲडव्होकेट ११ अलिबाग या संघामध्ये होणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन केले जाणार आहे. ए ग्रुपमधील अर्जून इलेव्हन दिघोडी आणि जे.डी.भार्गवी इलेव्हन अलिबाग या संघाचा उद्‌घाटनीय सामना सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास होणार आहे.त्यानंतर प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्ट्स साखर, आणि अलिबागमधील फैझी इलेव्हन तसेच बी ग्रुपमधील ए. बी. अलिबाग आणि यु. व्ही. स्पोटर्स अलिबाग, आद्य सप्लायर्स म्हात्रोळी आणि सिया वॉरिअर्स नागाव या संघामध्ये सामना होणार आहे. एकूण दहा संघाचे सामने भरविले जाणार आहेत. त्यामुळे गुरुवारी सायंकाळपासून शुक्रवारी पहाटे साडेतीन वाजेपर्यंत क्रिकेटचा थरार क्रीडा प्रेमींना पहावयास मिळणार आहे.

**प्रेक्षकांसाठी गॅलरीची व्यवस्था**

तीन दिवस रंगणाऱ्या नाईट क्रिकेट स्पर्धेचा आनंद प्रत्यक्ष घेता यावा, यासाठी सुस्जज अशी प्रेक्षक गॅलरी उभारण्यात आली आहे. खेळाडूंसाठीदेखील आसन व्यवस्था ठेवण्यात आली आहे. त्यामुळे एक वेगळा आनंद या मैदानात क्रिकेट प्रेमींना घेता येणार आहे.

## तेजीत मटका, 'खाकी'वर ठपका

रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात मोठ्या प्रमाणात मटका व्यवसाय जोमात सुरू आहे. यामध्ये मटका, जुगार, ऑनलाईन चक्री, चिमणी-पाखरं, पताडा, अंदर-बाहर, तीन पत्ती जुगार आदींचा समावेश आहे.

यामुळे सर्वसामान्य, कामगारांचे कुटुंब उध्वस्त होत आहे. स्थानिक पोलीस स्टेशनच्या वसुलदारांकडून हप्ते घेऊन हा व्यवसाय राजरोसपणे सुरू असल्याचे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे. त्यांच्या मदतीशिवाय हे अवैध व्यवसाय चालणे शक्यच नसते. हिंमत द्यायची, मटका सुरू करायला लावायचा आणि नंतर हप्ते वसूल करायचे अशा प्रकारातून 'तेरी बी चूप, और मेरी बी चूप' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. खाकी वर्दीकडून आर्थिक देवाण-घेवाण झाल्याने कारवाई केली जात नसल्याचा आरोप ॲड. काशिनाथ ठाकूर यांनी केला आहे.

## शाळेत मराठी बंधनकारक

शिक्षण विभागाचा रोडमॅप लवकरच तयार केला जाईल, असेही ते म्हणाले.

दादा भुसे यांनी शालेय शिक्षण मंत्री म्हणून पदाभार स्वीकारला. यानंतर त्यांनी राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा संस्थाचालक संघटना यांच्याशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्यांनी शालेय शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विकास व्हावा, यासाठीचे सर्वंकष धोरण आणले जाणार आहे. येत्या आठ दिवसात शालेय शिक्षण विभागाच्या धोरणाचा रोड मॅप समोर आणला जाईल. शालेय शिक्षण विकासाचा एक दशसूत्री कार्यक्रम जाहीर करून तो राबवला जाईल, असे दादा भुसे म्हणाले.

**इंग्रजी शाळांनाही नियम लागू**

इंग्रजी भाषा आवश्यक असली तरी राज्यात मराठी भाषा महत्त्वाची आहे. आता या भाषेला केंद्राकडून अभिजात ही दर्जा मिळाला आहे. त्यामुळे इंग्रजी शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक आहे. मात्र तरी काही शाळा यातून पळवाट काढत आहेत. अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याच्या तक्रारीही येत आहेत. आता राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे सक्तीचा कायदा करण्यात आला आहे.

यामुळे खासगी, सीबीएससी, आयसीएससी किंवा कोणत्याही इंग्रजी बोर्डाच्या शाळांना हा नियम लागू असणार आहे. तसेच मराठी भाषेचे अध्यापन करण्यास टाळाटाळ करणाऱ्या इंग्रजी शाळांवर शालेय शिक्षण विभागाची करडी नजर असणार आहे. ज्या शाळा मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ करत असतील, त्याची तक्रार पालकांना करता येणार आहे. तसेच या अशा शाळांवर योग्य ती कारवाई केली जाणार आहे, असेही दादा भुसे म्हणाले.

## कुंभमेळाव्याच्या सुरक्षेसाठी आयटीयूएस मरीनची निवड

गर्दीचे व्यवस्थापन, हवामानातील अनिश्चितता आणि इतर आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करणार असल्याचे आयटीयूएस मरीनचे व्यवस्थापक अंकित वाघ यांनी सांगितले. महाराष्ट्रात मुख्यालय असलेली आयटीयूएस मरीन ही प्रमुख समुद्री सुरक्षा उपाययोजना पुरवठादार कंपनी आहे. जी बचावकार्य, उभयचर तंत्रज्ञान आणि आपत्ती व्यवस्थापन यामध्ये तज्ज्ञ आहे.

## आता अवैध मासेमारीवर ड्रोनची नजर

राष्ट्रीय सागरी सुरक्षा व सुरक्षिततेच्या दृष्टीने समुद्रात ड्रोनद्वारे देखरेख ठेवण्याचे काम केले जाणार आहे. मासेमारीचे नियमन करण्याकरीता ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली भाडयाने घेण्यात आली आहे. रायगड जिल्ह्याच्या १२२ किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्यापासून राज्याच्या सागरी हद्दीपर्यंत म्हणजे १२ सागरी मैल अंतरापर्यंत ड्रोनद्वारे संशयीत हालचालीवर लक्ष ठेवले जाणार आहे. ड्रोन प्रणालीद्वारे अनाधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर नजर ठेवून अशा नौकांची माहिती पुराव्यासह उपलब्ध करून कार्यवाही करण्याकरिता ड्रोन प्रणालीच्या वेबसोलूशन, स्ट्रिमींगचा पुरावा म्हणून वापर करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा व श्रीवर्धन या दोन ठिकाणी सदरची सेवा भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयात ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणालीचा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

राज्यातील रायगडसह पालघर, रत्नागिरी आदी जिल्ह्यातील ०९ ठिकाणी ड्रोन प्रणालीचे उड्डाण व आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयातील नियंत्रण कक्षाचे उदघाटन ०९ जानेवारीला होणार असल्याची माहिती मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांनी दिली.

## रोहा हादरला! ११ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

वरसे, ता. रोहा) असे आरोपी व्यक्तीचे नाव असून ३० डिसेंबर रोजी त्याच्या शेजारी राहणारी एक ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी हि दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घरासमोरील रस्त्यावर सायकल चालवत होती. यावेळी आरोपी तेजस याने त्याची पत्नी घरात नसताना अल्पवयीन मुलीला घरात बोलावून तिच्याशी गैरकृत्य केले. हि बाब कोणाला सांगितले तर तू व तुझी आई दोघेही मराल असे धमकावून घरी पाठवून दिले.

आरोपीने असे वर्तत दोन-चार वेळा केल्याने पीडित मुलीने घडलेला सर्व प्रकार आपल्या काकीला सांगितला. नंतर या घटनेची माहिती पीडित मुलीच्या आई-वडिलांना समजली. याबाबत आरोपी व त्याच्या भावाला जाब विचारला असता आरोपी तेजस पडवळ याने पीडित मुलीच्या आई, बाबा, काका व काकींना शिवीगाळ करून मारहाण केली.

या घटनेची तक्रार देण्यासाठी सर्वजण गाडीत बसून पोलीस ठाण्यात जात असताना आरोपी तेजस गणेश पडवळ, अनुप गणेश पडवळ, दैनिक गणेश पडवळ यांनी आपसात संगनमत करून दुचाकीवरून त्यांचा पाठलाग केला. तसेच पोलिसांत तक्रार करु नये यासाठी पीडित मुलीच्या वडिलांना व काकांना मारहाण केली. या घटनेत पल्लवी नारायण पडवळ, नारायण कानू पडवळ व जितेंद्र कानू पडवळ हे तिघेजण जखमी झाले. याबाबत पीडित मुलीच्या आईने रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी आरोपी तेजस पडवळ, अनुप पडवळ व दैनिक पडवळ यांच्या विरोधात पोक्सो, मारहाण व शिवीगाळ करणे इत्यादी कलमानव्ये गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व. **श्री. दिनेश कुमार जवारा राम सेन व श्री. वसना लासु राम, राहणार – सदनिका क्र. २१०१, भूखंड क्र. २९४५, राऊत बिल्डींग, कारपेंटर दुसरी स्ट्रीट, गिरगाव, मुंबई – ४०० ००४** (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. सचो सतराम रियलटी तर्फे भागीदार मनिष ए. ऐलसिंघानी व रजत नेरश तलरेजा** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३९५४ | २६.१२.२०२४ | पुष्पक नोड | २७ | ४० | १८४० | १३.०९.२०२३ | १८.०९.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३९१/२०२४-२५



## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे बेलकडे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान राजेंद्र दत्तात्रेय नाईक यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे बेलकडे, ता.अलिबाग, जि. रायगड, गट नं. १४६/३, क्षेत्र ०-७६-७० गुंठे, पो.ख.०-०९-९०, आकार १५.५० पैसे पैकी राजेंद्र दत्तात्रेय नाईक यांच्या मालकीची ०-०९-००, पो.ख. ०-०७-३०, आकार रु. १.८२ पैसे ही मिळकत हा या नोटीसचा विषय आहे.**

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०९.०१.२०२५

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८. आनंद अपार्टमेंट,
श्रीबाग-३, अलिबाग



महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई-निविदा सुचना

| अ. क्र. | ई-निविदा क्रमांक | ई-निविदा तपशील | अंदाजपत्रकाची किंमत | निविदा शुल्क/ बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३००००५३९७९ | कौडगाव सोलर पॉवर प्लांट ते धाराशिव (उस्मानाबाद) सबस्टेशन पर्यंत 33kV O/H आणि UG इव्हॅक्युएशन लाईन (evacuation line) चे २ वर्षासाठी देखभालीचे काम करणे. | रु.४८,५०,६३०/- | रु. १,१८०/- रु. ५२,००६/- |
| ०२ | ३००००५३६२२ | भिरा अवजल विद्युत केंद्र रवाळजे येथे सिंक्रोनस कंडेन्सर मोड (Synchronous Condenser Mode) ऑपेरेशनसाठी एअर कॉम्प्रेसर (Air Compressor) चापुरवठा व चालू (supply, installation and commissioning) करणे. | रु. ८,९१,९००/- | रु. १,१८०/- रु. १२,४१९/- |

निविदा विक्री कालावधी व सादर करण्याची अंतिम तारीख अ. क्र. १: ०९.०१.२०२५ (स. ११:००वा.) पासून ते २३.०१.२०२५ (सायं.५:०० वा.) पर्यंत.
निविदा विक्री कालावधी व सादर करण्याची अंतिम तारीख अ. क्र. २: ०९.०१.२०२५ (स. ११:००वा.) पासून ते २९.०१.२०२५ (सायं.५:०० वा.) पर्यंत.

अधिक माहितीकरता आमच्या **https://eprocurement.mahagenco.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी.

संपर्क :
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
नवीकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे
प्लॉट क्र. १०६, प्रकाश भवन, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ०१६.
ई-मेल– segenpune@mahagenco.in, ee_bhira@mahagenco.in, 50mwkaudgaon@mahagenco.in
संपर्क – ७७६७८७८२५५, ८८०५००८८६२, ९५११६५३०९५

**अधीक्षक अभियंता**
**नवीकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे.**



## ग्रुप ग्रामपंचायत कुंभे

**ता. माणगाव, जि. रायगड**

### निविदा सूचना

कुंभे ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत इच्छुक ठेकेदाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | काम पूर्ण करण्याचे कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शौचालय दुरुस्ती केलगन येथे | १५ व वित्त आयोग | ४९८४० | ३ महिने | १५/०१/२०२५ | कार्यालयीन वेळे पर्यंत | ग्रा.प.कार्यालय कुंभे |
| २ | सार्वजनिक शौचालय बांधकाम | १५ व वित्त आयोग | ९२२२३ | ३ महिने | १५/०१/२०२५ | कार्यालयीन वेळे पर्यंत | ग्रा.प.कार्यालय कुंभे |
| ३ | सार्वजनिक शौचालय बांधकाम | १५ व वित्त आयोग | १२४९६० | ३ महिने | १५/०१/२०२५ | कार्यालयीन वेळे पर्यंत | ग्रा.प.कार्यालय कुंभे |

**अटी व शर्ती**

१ १ टक्के इसारा रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेचा कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी भरावी लागेल व उर्वरित कपात रक्कम देकायतून अदा केली जाईल.
२ कोरे निविदा फॉर्म रक्कम रुपये १००% इतकी रहील.
३ कामाचे अंदाज पत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास शुल्क भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४ प्राप्त निविदा माहे १६/१/२०२५ मासिक सभेत ग्रामपंचायत कार्यालय कुंभे येथे उपस्थितांचा समक्ष मा.सरपंच यांचा हस्ते उघडण्यात येईल.
५ निविदा भरणाऱ्या ठेकेदारांचे रजिस्ट्रेशन केलेले दाखले हे सत्य प्रत केलेले असावेत व चालू आर्थिक वर्षात केलेल्या कामाचा समक्ष प्राधिकाऱ्याचा दाखला असावा व ठेकेदार हा नोंदणीकृत (GST धारक) असावा
६ कोणतीही एक किंवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकाराय वा सरपंच कुंभे यांनी राखून ठेवला आहे.
७ प्रत्येक देकायकडून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील संबंधित खात्याचे मा. अभियंता सो ग्रामपंचायतीचे पदाधिकारी / सदस्य याचा मार्गदर्शन व देखरेखी खाली सदर काम करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्यांची स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवेले आहेत.
८ काम अंतिमरित्या पूर्ण झाले नंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९ प्राप्त निधी नुसार PFMS प्रणाली द्वारे कामाचे देयक अदा केले जाईल.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंभे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंभे**
**जि. रायगड ता. माणगाव,**

# अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले

## • श्रीवर्धन नगरपरिषदेची तोडक कारवाई

| श्रीवर्धन | वार्ताहर |

**श्रीवर्धन शहरातील चौकर पाखाडी परिसरामध्ये पुणे येथील एका धनदांडग्याने जागा खरेदी केली होती. या व्यक्तीने या जागेमध्ये नगरपरिषदेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता आरसीसीचे अनधिकृत जोते बांधले होते. हे अनधिकृत बांधकाम काढून टाकावे, अशा प्रकारची नोटीस श्रीवर्धन नगर परिषदेने संबंधित बांधकाम करणाऱ्या व्यक्तीला बजावली होती. मात्र, संबंधित व्यक्तीने नाताळच्या सुट्टींचा फायदा घेऊन या ठिकाणी पुढील बांधकाम करण्यासाठी सेंट्रिंग ठोकले. यावर नगरपरिषदेने तोडक कारवाई करत उभे करण्यात आलेले सेंट्रींग तसेच जोते जमीनदोस्त करण्यात आले आहे.**



श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यासाठी नगरपरिषदेकडून पूर्वपरवानगी घ्यावी लागते. त्याचप्रमाणे नगर रचना विभागाकडून देखील ना हरकत दाखला घ्यावा लागतो. मात्र, अनधिकृत बांधकाम करणारा अमित औरंगाबादकर याने जवळजवळ ३ हजार स्केअर फुट बांधकाम त्या ठिकाणी केल्याचे नगरपरिषदेच्या निदर्शनास आले होते. त्या ठिकाणी अमित औरंगाबादकर हे पर्यटकांसाठी हॉटेल बांधत असल्याचे निदर्शनास आल्याकारणाने तसेच, नोटीस बजावल्यानंतर देखील कोणत्याही प्रकारे उत्तर न दिल्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेने या अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई केली आहे.

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत असे प्रकार पुन्हा घडु नयेत यासाठी नगरपरिषदेने कडक पावले उचलल्याचे मुख्याधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले आहे. यावेळी, श्रीवर्धन नगरपरिषदेने जेसीबी लावून उभे करण्यात आलेले सेंट्रींग तसेच जोते जमीनदोस्त केले आहे. या कारवाईमुळे श्रीवर्धन शहरामध्ये अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनी ही कारवाई अत्यंत कार्य तत्परतेने केल्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

> **श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत अशा प्रकारे कोणीही व्यक्ती अनधिकृत बांधकाम करण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्या व्यक्तीवर फौजदारीची कारवाई करण्यात येईल. तसेच, अनधिकृत बांधकाम आढळल्यास त्यावर तोडक कारवाई करण्यात येईल.**
> **– विराज लबडे,**
> मुख्याधिकारी तथा प्रशासक, श्रीवर्धन नगरपरिषद

# ई-रिक्षा चालू ठेऊन उपोषण करा

## पालकांसह पर्यटकांकडून मागणी

| माथेरान | वार्ताहर |

माथेरानमध्ये प्रायोगिक तत्त्वावर एकूण २० ई-रिक्षा सुरू आहेत. सहा महिन्यांचा हा पायलट प्रोजेक्ट डिसेंबरमध्ये पूर्ण झाला असून उर्वरित ७४ ई-रिक्षा सुद्धा लवकरच सुरू व्हाव्यात यासाठी श्रमिक हातरीक्षा चालक-मालक संस्थेच्या सदस्यांनी १४ जानेवारी पासुन ई-रिक्षा बंद ठेऊन बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार केला आहे. त्याबाबतचे लेखी पत्र या संस्थेच्या सदस्यांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांना सादर केले आहे. ही सेवा बेमुदत बंद करण्यात येणार असल्याचे समजल्यावर पालक वर्गासह पर्यटकांमध्ये नाराजीचे सावट पसरले आहे.



ई-रिक्षा बंदमुळे शालेय विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. येथे येणाऱ्या जेष्ठ पर्यटकांना सुद्धा याचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. नियमितपणे कॉलेजला जाणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देखील या बंदची झळ सोसावी लागणार आहे. त्यासाठी या ई-रिक्षांची सेवा बंद न करता शालेय विद्यार्थी, रुग्ण आणि आपत्कालीन व्यवस्था म्हणून सुरू ठेवाव्यात, अशी मागणी पालकांसह पर्यटकांकडून होत आहे.

> **आम्ही आता दोन दिवस माथेरानमध्ये मुक्कामी आहोत. आम्हाला असे समजले आहे की या ई-रिक्षांची सुविधा १४ जानेवारी पासून बेमुदत बंद करणार आहेत. आमचे रिलेटिव्ह सुद्धा माथेरान फिरायला १४ तारखेला येणार आहेत. त्यांना आम्ही सांगितले आहे की, येथे वाहतुकीची सुविधा ई-रिक्षामुळे छान झाली आहे. परंतु, हे बंद वगैरे होणार असेल तर दुसरीकडे फिरायला गेलेलेच बरे.**
> **– मयांक भानुशाली, पर्यटक, मुंबई**

# ऑनलाइन रेशनकार्ड रखडले

| नवीन पनवेल | वार्ताहर |

पनवेल पुरवठा विभागात अनेकांचे ऑनलाईन रेशनकार्ड रखडले आहेत. त्यामुळे या कार्यालयात रेशन कार्ड धारकांना अनेक खेटा माराव्या लागत आहेत. जवळपास २५० ते ३०० नागरिकांचे रेशन कार्ड रखडलेले आहेत. हा आकडा आणखी वाढू शकतो. त्यामुळे रोजच या ठिकाणी रेशन कार्डसाठी नागरिकांच्या रांगा लागत आहेत.

तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाच्या धिम्या कारभाराचा फटका नागरिकांना बसत आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून ऑनलाईन शिधापत्रिका प्रक्रिया रखडली असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अनेकांना रेशनचे धान्य मिळत नसल्याच्या तक्रारीत वाढ होत आहे. मुदतीत शिधापत्रिका प्राप्त होत नसल्याने नागरिकांना पुरवठा विभागात फेऱ्या माराव्या लागत आहेत. शिधापत्रिके अभावी नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. बोरले येथील एका महिलेला चार महिने होऊन गेले तरी देखील रेशनकार्ड मिळाले नाही. यावेळी, सही झालेली नाही, ऑनलाईन झालेले नाही अशी कारणे दिली जात आहेत. अडीचशे ते तीनशे नागरिकांचे ऑनलाईन रेशन कार्ड रखडल्याने नागरिक चिंतेत आहेत. याबाबत पुरवठा निरीक्षण अधिकारी अश्विनी धनवे यांना विचारले असता केवळ ८२ ऑनलाईन रेशनकार्ड रखडल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# कुक्कुट पालनासाठी पिल्लांचे वाटप

## • पंचायत समिती सेस फंडातून राबविली योजना



| उरण | वार्ताहर |

पशुसंवर्धन विभामार्फत उरण तालुक्यात ग्रामीण भागातील महिलांसाठी ५० टक्के अनुदानावर महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात आली. पंचायत समिती सेस फंडातून गटविकास अधिकारी समीर वाठरकर यांच्या मार्गदर्शनाखाली योजना राबविण्यात येत आहे. दरम्यान, महिलांना कुक्कुट पालनासाठी पिल्लांचे वाटप करण्यात आले.

मागील तीन-चार वर्षांपासून ग्रामीण भागातील महिलांकडून कुक्कुट पिल्लांच्या योजनांची मागणी होत होती. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने कुक्कुट पिल्लांसाठी तालुक्यातून अर्ज मागविले होते. प्राप्त झालेल्या एकूण ७६ अर्जांपैकी ५० लाभार्थ्यांची निवड झाली. या लाभार्थ्यांसाठी प्रत्येकी ६० पिल्लांप्रमाणे शासकीय अनुदानातून एकूण ३ हजार पिल्लांचे आरक्षण केंद्रीय कुक्कुट विकास संस्था, गोरेगाव-मुंबई येथे करण्यात आले. पहिल्या टप्प्यात मंगळवारी (दि.७) २५ लाभार्थ्यांना प्रत्येकी साठ पिल्ले वाटप करून संगोपनाचे प्रशिक्षण देण्यात आल्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. सोमनाथ भोजने यांनी सांगितले.



**पनवेल तालुक्यातील खैरवाडी ग्रामपंचायत हद्दीत कोंडले एकदंत सोसायटीजवळील रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जात आहे. या कचऱ्यामुळे ये-जा करणाऱ्यांना दुर्गंधीला सामोरे जावे लागते. येथे टाकण्यात आलेला कचरा खाण्यासाठी पाळीव जनावरे येत असून प्लास्टिकजन्य वस्तू त्यांच्या पोटात गेल्यास त्यांच्या जीवाला देखील धोका निर्माण झाला आहे. (छायाचित्रः राजेश डांगळे)**

# महिला बेपत्ता

| पनवेल | वार्ताहर |

घरात झालेल्या किरकोळ वादातून महिला कोणाला काही न सांगता निघून गेल्याची तक्रार रबाळे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. निरु गणेश पाटील (५८) असे या महिलेचे नाव असून उंची ५ फुट ५ इंच, रंग सावळा, डोक्याचे केस काळे लांब, डोळे काळे, नाक सरळ, बांधा मध्यम असून अंगात गुलाबी रंगाची साडी, निळ्या रंगाचा ब्लाऊज घातलेला आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी रबाळे पोलीस ठाणे (०२२-२७६०६१६२) किंवा पो.हवा. संदीप नवले (९८६७७८२२७०) यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेलमधील सराईत मोटारसायकल चोराला अटक

| पनवेल | वार्ताहर |

पनवेल शहरासह तुर्भे व सीबीडी परिसरातुन मोटारसायकली चोरणाऱ्या एका सराईत गुन्हेगारासला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, पनवेल परिसरातून ३ मोटारसायकली तसेच तुर्भे व सीबीडी परिसरातुन काही मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना घडली होती. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे, पोलीस हवालदार नितीन वाघमारे, पोलीस हवालदार अविनाश गंथडे, पोलीस हवालदार अमोल डोईफोडे, पोलीस हवालदार परेश म्हात्रे, पोलीस हवालदार महेंद्र वायकर, पोलीस नाईक विनोद देशमुख, पोलहा शिपाई चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने सराईत आरोपी अजयलाल कौल (३०) याला ताब्यात घेतले आहे. तसेच, त्याच्याकडून १ लाख ५ हजार रुपये किमतीच्या ५ मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांकडून देण्यात आली आहे.



# नेरळ माथेरान घाटरस्ता रोखणार

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील माथेरान डोंगरात असलेल्या १२ आदिवासी वाड्या एकत्र जोडणारा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बनविला जाणार आहे. या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन विधानसभा निवडणुकीच्या आधी झाले आहे. मात्र, अद्याप १५ कोटी खर्चून बांधण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कामाला सुरुवात झालेली नाही. दरम्यान, चार महिने उलटून देखील रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नसल्याने जनजागृती आदिवासी विकास संस्था येत्या प्रजासत्ताक दिनी उपोषण करणार आहे. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जैतु पारधी आणि सचिव गणेश पारधी यांनी रस्त्याच्या कामाशी संबंधित असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांना आंदोलनाची नोटीस दिली आहे.

माथेरान डोंगरात पिढ्यानपिढ्या वसलेल्या १२ अदिवासी वाड्या आहेत. या अदिवासी वाड्या रस्त्यापासून अजूनही वंचित आहेत. नेरळ माथेरान घाट रस्त्यातील जुम्मापट्टी येथून या वाड्यांकडे जाण्यासाठी रस्ता जातो. जुम्मापट्टी धनगर वाडा, बेकरे वाडी, धनगर पट्टा, आसंल वाडी, नाण्याचा माळ, मणा धनगर वाडा, सागाची वाडी, चिंच वाडी, आषाने वाडी, सावरगाव वाडी, किरवली वाडी, भूतिवली वाडी या वाड्यांना जोडणाऱ्या रस्त्याच्या कमाचा भूमिपूजन सोहळा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी उरकण्यात आले होते. या कामाचे भूमिपूजन आ. महेंद्र थोरवे यांचे हस्ते झाले होते.



## निवडक



### मनोहर पाटील यांचा सन्मान

**अलिबाग** : अलिबाग तालुक्यातील भाल येथील मनोहर काशिनाथ पाटील यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय काम गिरीबद्दल स्व.मा.आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विधान परिषदेचे आ. भाई जगताप, आ.हेमंत ओगले, मा.आ. रवींद्र धंगेकर, उमेश ठाकूर आदी मान्यवरांच्या हस्ते मनोहर पाटील यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रदेश कॉंग्रेस सचिव ॲड. प्रवीण ठाकूर, राजाभाऊ ठाकूर, ठाकूर कुटुंबीय, महिला पायलट प्राप्ती ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते आरिफ बामणे, सुनील थळे, तोडणकर गुरुजी आदी मान्यवरांसह पुरस्कार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तीर्थक्षेत्र परिसरात नेटवर्क गायब

**पाली/गोमाशी** : सुधागड तालुक्यातील श्री बल्लाळेश्वर पाली हे अष्टविनायक तीर्थक्षेत्रापैकी एक धार्मिक स्थळ आहे. या ठिकाणी महाराष्टातून अनेक भाविक मोठ्या संख्येने भक्तिभावाने गणपतीच्या दर्शनासाठी येत असतात. मात्र, या ठिकाणी येणाऱ्या भाविकांची तसेच स्थानिक नागरिकांची भारत संचार निगम लिमिटेड या कंपनीचे नेटवर्क नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.तसेच, मंदिर परिसरात रहाणारे बीएसएनएल मोबाईल धारक गेल्या काही महिन्यांपासून नेटवर्किंगच्या त्रासाला कंटाळुन गेले आहेत. जर अशीच समस्या कायम राहिली तर ग्राहकांना आपले सिमकार्ड दुसऱ्या कंपनीमध्ये पोर्ट करून घेण्याची वेळ येइल, असे बीएसएनएल ग्राहकांनी कृषीवल प्रतिनधीशी संवाद साधताना सांगितले आहे.






### शहाबाजमधील वाचनालयात वाचन संकल्प

**अलिबाग** : वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा व्यापक उपक्रम १ ते १५ जानेवारीपर्यंत राबविण्यात येत आहे. सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय शहाबाज तर्फे शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून ग्रंथालयाचे सचिव प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सामूहिक वाचन तसेच वाचनाचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी, विद्यार्थ्यांसोबत त्यांचे पालकही उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नितीन पाटील, उपाध्यक्ष मंगेश भगत, प्रशांत पिंगळे, प्रशांत पाटील आणि ग्रंथालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### दुचाकी झाडावर आदळून चालकाचा मृत्यू

**पनवेल** : भरधाव वेगात दुचाकी चालवताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याकडेच्या आंब्याच्या झाडावर धडकून झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. किरण लाला बोरसे (२४) असे त्याचे नाव असून तो पनवेलमधील विहिघर येथे राहत होता. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताला मृत तरुणाला जबाबदार धरून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. किरण हा पनवेल-माथेरान रस्त्याने दुचाकी चालवत आपल्या घरी जात होता. यावेळी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने किरणची दुचाकी रस्त्याच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या झाडावर जाऊन आदळली. या अपघातात किरण गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथेच त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.




## प्रभाकर पाटील वाचनालयात 'वाचन संकल्प उपक्रम' | शैला पाटील यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

# बौध्दीक क्षमतेसाठी वाचन महत्वाचे

| अलिबाग | प्रतिनिधी |

बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा वापर प्रचंड वाढला आहे. त्यामध्ये मोबाईलचा वापर वाढू लागला आहे. त्यामुळे पुस्तक व इतर ग्रंथ, वृत्तपत्र वाचनाकडील कल कमी होण्याची भिती निर्माण झाली आहे. शासनाने वाचन संकल्प उपक्रम राबवून वाचनाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. वाचनामुळे चिंतन करण्याबरोबरच बौध्दीक क्षमता वाढीला चालना मिळते. त्यामुळे वाचन महत्वाचे आहे, असे प्रतिपादन रायगड जिल्हा ग्रंथालयाच्या कार्यवाह शैलापाटील यांनी केले आहे.



वाचन संकल्प महाराष्ट्र पंधरवडा उपक्रमांतर्गत प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय व तालुका ग्रंथालय अलिबाग, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचन संकल्प उपक्रम' बुधवारी (दि.८) अलिबागमधील प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयात राबविण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, कोमसाप अलिबागचे सहकार्यवाह नंदू थळकर, माजी नगरसेवक आर. के. घरत, ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, हेमकांत सोनार, शिक्षिका प्रमिला म्हात्रे, प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथपाल ज्योती म्हात्रे, कर्मचारी झेबा कुरेशी व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांचा सन्मान

**वाचन संकल्प महाराष्ट्र पंधरवडा जिल्ह्यात सुरु आहे. अलिबाग नगरपरिषद शाळा क्रमांक तीनमधील विद्यार्थ्यांनी या निमित्ताने बुधवारी प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालयाला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना वाचनालयाची माहिती देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी वाचनालयातील गोष्टींची व इतर विषयांतील पुस्तकांचे वाचन केले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, जिल्हा ग्रंथालयाच्या कार्यवाह शैला पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वाचनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. दरम्यान, सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**

# गुलाबीरावांचे राग-रंग

लोकसभा निवडणुकीला अजितदादांच्या गटाला दणकून मार बसला. अवघा एक खासदार निवडून आला. तोही काय करामती करून जिंकला हे तिथल्या स्थानिकांना ठाऊक आहे. खुद्द दादांच्या पत्नी बारामतीमधून हरल्या. अजितदादा संपले असे राजकीय निरीक्षकांना वाटले. पण त्यांच्याकडे शेकडो कोटी रुपये आहेत हे ते विसरले. दादांनी ते रुपये कामी लावले. भाराभर पैसे देऊन एक दिल्लीच्या जाहिरात एजन्सीचा सल्ला घेतला. एजन्सीने बरेच मोठमोठे इंग्रजी शब्द वापरले. इकडून तिकडून जमा केलेले भरपूर आकडे तोंडावर फेकले. त्यांचे आलेख काढून दाखवले. शेवटी त्यांनी निष्कर्ष असा काढला की, दादांनी आपला रंग बदलला पाहिजे. म्हणजे दादा तसे रंग बदलण्यात आधीपासूनचउस्ताद होते. एकदा पहाटेच्या वेळी हा रंग बदलताना गडबड झाली. तो नंतर फिका पडला. पण दुसऱ्या वेळी बदललेला रंग नीट पक्का बसला. त्यामुळे आता आणखी काय रंग बदलणार असे दादांना वाटले. पण एजन्सी म्हणाली की तेव्हा तुम्ही सत्ता मिळवण्यासाठी रंग बदलला. आता मतदारांसाठी बदला. मतदारांना तुमचा खरा रंग कोणता हे ओळखता येता कामा नये. तुम्ही गुलाबी रंग धारण करा. तिकडे प्रफुल्ल पटेल यांचे सगळे रंग उडायची वेळ झाली होती. त्यामुळे ते घाईवर होते. त्यांनी गोडीगुलाबीने हे गुलाबी नाटक दादांच्या गळी उतरवले. मग दादांना गुलाबी जाकिटेशिवण्यात आली. प्रचाराच्या गाड्या गुलाबी रंगात रंगल्या. पताका गुलाबी, फेटे गुलाबी, गुलाल गुलाबी, फुले गुलाबी असे सगळे वातावरण गुलाबी झाले. विधानसभेच्या प्रचारात आपण कोणावरही टीका करणार नाही असे दादा म्हणाले. सर्वत्र मतदारांना त्यांनी हात जोडले. लाडक्या बहिणींना मायेची हाक घातली. नवा-नवा माळकरी दोस्तांच्या संगतीत आणि मटणांच्या पंगतीत आपली माळ पुन्हा पुन्हा दाखवून सगळ्याला 'नको, नको' म्हणतो. तसे दादा निवडणुकीच्या प्रचारातल्या आरोप-प्रत्यारोपांना 'नको नको' म्हणत राहिले. दादांचा गुलाबी रंग जनतेला पसंत आला. इतका की, बहुसंख्य भगव्यांनीही त्यांना दणकून मतदान केले. काकांनी जे लोकसभेला केले ते दादांनी विधानसभेला केले.

### काय भुललासिवरलिया रंगा

तेरड्याचे रंग तीन दिवस असे म्हणतात. तेरड्याची फुलेही गुलाबीच असतात. पण जनतेचे लाडके दादा म्हणजे काही तेरडा नव्हेत. त्यामुळे त्यांचा रंग चक्क तीन महिने टिकला. निकाल लागले. दादा आपल्या लाडक्या उपमुख्यमंत्रिपदीरुजू झाले. मग मात्र हे रंगरुप टिकवून ठेवणे अवघड झाले. गुलाबी जाकिटे कपाटात गेली. विधानसभेच्या अधिवेशनात दादा आपल्या मूळ रुपात दिसू लागले. एकदा चर्चेत मध्येच बोलणाऱ्याभाजपच्यागिरीश महाजनांना त्यांनी 'गिरीशयावेळीतुझंमंत्रिपद जाता-जाता राहिलंय', असं सुनावलं. नंतर कराडला रोहित पवार भेटले तेव्हा त्यांना 'माझ्या पाया पड, माझी सभा झाली नाही म्हणून तू कर्जतमधून निवडून आलास', असं ऐकवलं. लोकांनाही बहुदा दादा मूळ रुपात आल्याने बरे वाटले असेल. पण परवा बारामतीत त्यांचा रागरंग काही औरच दिसला. एका सभेत ते एकेक काम मार्गी लावत होते. त्यावेळी काही कार्यकर्त्यांनी एका कामाचा आग्रह धरला. बाकीच्यांनी त्याला दुजोरा दिला. इतक्या दिवसांचा दादांचा संयम बहुदा सुटला. ते कार्यकर्त्यांना म्हणाले की तुम्ही मते दिली म्हणजे काय मालक झाले काय? आम्हाला आता सालगडी करता की काय? चोखामेळा यांनी ऊस डोंगा परी रस नाही डोंगा असे म्हटले आहे. त्यानुसार, दादामधले हे बाह्यतः डोंगेपण किंवा वाकुडपण उसाच्या प्रदेशातल्या बारामतीकरांना नवीन नाही. त्यामुळे ते कदाचित याचे फार वाईट वाटून घेणार नाहीत. तरीही आपण निवडणुकीत दादांच्या वरलिया रंगाला भुललो की काय असे त्यांच्या मनात आल्याखेरीज राहणार नाही. दादांना ती दिल्लीवाली एजन्सी अजूनही सल्ला देते का याची कल्पना नाही. बहुदा नसावी. आणि समजा असली तरी तिचा सल्ला दादा आता किती मानतील याची शंकाच आहे. विधानसभेच्या प्रचाराच्या काळात 'पत्नीला तिकिट दिले हे चुकले', 'काकांवर वयावरून टीका केली हे चुकले', अशा इतक्या चुका इतक्या वेळा दादांनी मान्य करून झाल्या आहेत की आपला पुढच्या दहा वर्षांचा माफीचा कोटा पूर्ण झाला आहे असे बहुदा दादांना वाटत असेल.

### गुंतुनी गुंत्यात साऱ्या

अर्थात, निवडणुकीच्या काळातगुलाबीराव होणारे आणि नंतर आपला खरा रंग किंवा रागरंग दाखवणारे दादा हे एकटेच नेते नाहीत. शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड हे तिकडे बुलडाण्यात जाहीर सभेत लोकांवर भडकले. आपल्याला कमी मते पडली याचा त्यांना राग आहे. तो बाहेर काढताना त्यांनी भाषेचे असे काही रंगढंग उधळले की ज्याचे नाव ते. तुम्हाला मटण, दारू आणि पैसे हवेत, पण मत द्यायला नको, तुमच्यापेक्षा वेश्यासुध्दाबऱ्या असे तारे गायकवाड म्हणाले. हे पैसे, दारू व मटण त्यांनीही वाटले असा त्याचा अर्थ होतो. मतदारांना लालूच दाखवणे हा गुन्हा आहे. त्याची जाहीर कबुली त्यांनी दिली आहे. खरे तर त्यांच्यावर निवडणूक आयोग वा सरकारने कारवाई करायला हवी. पण ते होणार नाही. कारण, गायकवाड यांनी प्रत्यक्ष दारू इत्यादी वाटप केल्याचे पुरावे नाहीत असे आयोग साळसूदपणे सांगेल. त्यांच्या पक्षाचे नेतेही त्यांना सांभाळून घेतील. याच गायकवाडांनी ऐन विधानसभेच्या प्रचारात 'राहुल गांधी यांची जीभ काटणाऱ्याला ११ लाखांचे बक्षिस देऊ' असे जाहीर केले होते. राहुल यांनी आरक्षण काढून घेऊ असे अमेरिकेत म्हटल्याचा खोटाच आरोपही त्यांनी केला होता. या गायकवाडांचा इतिहास असा काळा असल्यावर त्यांनी आता असे रंग उधळावेत यात नवल वाटण्याचे कारण नाही. तरीही त्यांनी हिरवेपिवळे होऊन मतदारांना असे शिव्याशाप द्यावेत हे नवीन म्हणावे लागेल. मतदार म्हणजे मायबाप असे म्हणण्याची एक रीत रुढ आहे. प्रत्यक्षात आपण कोणाचेही मायबाप नसून लोकशाहीतील अनाथ लेकरं आहोत हे मतदारांना ठाऊक असते. पण तरीही ते कधी कधीहुरळून जातात आणि फसतात. रंग माझा वेगळा किंवा पार्टीविथडिफरन्स असे म्हणून आलेल्या एका पक्षाचा दारुण अनुभव गेली दहा वर्षे ते घेत आहेतच. अर्थात, एक गोष्ट खरी, की या तथाकथित वेगळा रंगवाल्या पक्षाने जनतेला अमुक मंदिर, तमुक गाय, आणखी तमुक जिहाद अशा गुंत्यांमध्ये चांगलेच अडकवले आहे आणि आपला पाय मात्र अदानी किंवा कोणत्याच गुंत्यात अडकणार नाही याची काळजी घेतली आहे.

## विचार

# एचएमपीव्ही संसर्गाचा भारत प्रवेश

**चीनमधील एचएमपीव्हीच्या संसर्गाची वाढती प्रकरणे पाहता भारतातही याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. भारतीय आरोग्य सेवांचे महासंचालक डॉक्टर अतुल गोयल यांनी मात्र चिंतेचे कारण नसल्याचे स्पष्ट केले असले, तरीही कर्नाटकमध्ये दोन तर गुजरातमध्ये या संसर्गाची बाधा झालेले रुग्ण आधळून आले आहेत. त्यातील दोन रुग्ण हे १४ वर्षाखालील आहेत ही विशेष चिंतेची बाब आहे.**



चीनमध्ये मानवी मेटापन्यूमो व्हायरसच्या प्रकरणांमध्ये वाढ होत आहे. भारतातही कर्नाटकमध्ये दोन तर गुजरातमध्ये एक रुग्ण आढळून आला आहे. कोव्हिड १९ साथीच्या आजारानंतर जगापुढे, इन्फ्लूएंझा ए, मायकोप्लाइमा न्यूमोनियासारख्या एकाधिक व्हायरसची पुनरावृत्ती होण्याची भीती आहे.

### कोव्हिड -१९ चा जागतिक परिणाम

जवळपास संपूर्ण जगाला हादरवून सोडणाऱ्या कोविड-१९ महामारीचे दुष्परिणाम जग अजूनही अनुभवत आहे. भारतासह इतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेतील वाढीचा दर कमी करून या विषाणूने जागतिक अर्थव्यवस्थेवर आघात केला. जग त्यातून बाहेर पडत असताना मेटापन्यूमो व्हायरससारख्या व्हायरसचा नवा धोका संपूर्ण जगात पसरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### एचएमपीव्ही विषाणू काय आहे?

अमेरिका सरकारच्या सेंटर फॉर डिसिज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन (सीडीसी) नुसार मानवाला २००१ मध्ये याचा संसर्ग मानवाला होऊ शकतो, याची माहिती मिळाली होती. या विषाणूचा संसर्ग सर्वच वयोगटातील लोकांना होऊ शकतो. यामुळे रुग्णाला ताप, खोकला, नाक चोंदणे, श्वास घ्यायला त्रास होणे याचा सामना करावा लागू शकतो. याचा संसर्ग वाढला तर या विषाणूमुळे ब्रोन्काइटिस किंवा न्यूमोनिया देखील होऊ शकतो. या विषाणूचा इन्क्यूबेशन पीरियड साधारणपणे तीन ते सहा महिने असतो. पण आजारपणाचा काळ कमी जास्त असू शकतो. संसर्ग किती गंभीर आहे, यावर ते अवलंबून असते.

### एचएमपीव्ही कसा पसरतो?

खोकताना किंवा शिंकताना बाहेर पडणाऱ्या तुषारांतील कणांद्वारे या विषाणूचा प्रसार होतो आणि इतरांना संसर्ग होतो. हाथ मिळवणे, गळा भेट घेणे किंवा एकमेकांना स्पर्श केल्यानेही हा विषाणू पसरू शकतो. खोकला किंवा शिंकल्याने एखाद्या भागावर तुषार पडले असतील आणि त्याठिकाणी स्पर्श केलेला हात आपण चेहरा, नाक, डोळे किंवा तोंडाला स्पर्श केला तरीही संसर्ग होऊ शकतो.

### मेटापन्यूमो व्हायरसची जगातली आजवरची स्थिती

चीनमध्ये डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात श्वसनाशी संबंधित आजाराच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. एका रिपोर्टनुसार रुग्णांत रायनोव्हायरस आणि ह्युमन मेटान्यूमो व्हाइरस (एचएमपीव्ही) च्या संसर्गाची अधिक प्रकरणं आहेत. भारतात या संसर्गाची बाधा झालेले ३ रुग्ण आधळून आले आहेत. संसर्ग होणाऱ्यांमध्ये १४ वर्षाखालील मुलांची संख्या सर्वाधिक आहे. इंडोनेशियाच्या आरोग्य मंत्रालयाने काही दिवसांपूर्वी एक निवेदन जारी केलं आहे. त्यात चीनमध्ये इनफ्लुएन्झा ए आणि श्वसनाच्या आजाराशी संबंधित विषाणूंबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. हाँग काँगच्या फ्री प्रेसनं काही दिवसांपूर्वी एका रिपोर्टमध्ये हाँग काँगमध्ये एचएमपीव्ही संसर्गाची काही प्रकरणे समोर आल्याचे सांगितले. पण त्याचा आकडा कमी आहे.

### वैद्यकीय तज्ज्ञांची मते

हा एखाद्या सामान्य विषाणूसारखा असून तो श्वसन नलिकेला संसर्ग करतो. त्यामुळं सर्दीसारखे आजार होऊ शकतात. एका वर्षापेक्षा कमी वयाची मुले आणि ज्येष्ठांमध्ये याच्या संसर्गामुळं फ्लूसारखी लक्षणं पाहायला मिळू शकतात. त्यामुळं कोणताही गंभीर परिणाम होत नसल्यानं फारशी चिंतेची बाब नाही. हिवाळ्याच्या काळात तसेही सर्दीच्या प्रकरणांमध्ये वाढ झालेली पाहायला मिळते. आपली आरोग्य यंत्रणा या स्थितीचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

### डॉक्टरांचे म्हणणे काय?

दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयातील बाल रुग्ण विभागाचे डॉक्टर सुरेश गुप्ता यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना हा काही नवा विषाणू नसल्याचं सांगितलं. त्यांच्यामते, याबाबत वीस वर्षांपासून माहिती उपलब्ध आहे. हिवाळ्याच्या काळात याच्या संसर्गाची प्रकरणं समोर येतात. हा फ्लूसारखा विषाणू आहे. यासाठीही सामान्य सर्दीला दिली जाणारी औषधंच दिली जातात. तसेच आजारी व्यक्तीला आरामाचा सल्ला दिला जातो. बहुतांश प्रकरणांत रुग्णालयात दाखल करण्याचा सल्लाही दिला जात नसल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या भारतात या विषाणूचा जो प्रकार आहे त्यामुळं फार गंभीर संसर्ग होत नाही. ज्याप्रकारे कोविडचा विषाणू गंभीर रुप धारण करत होता, तसे प्रकार अजून पाहायला मिळाले नाहीत. चीनमधील या विषाणूचा स्ट्रेन किती घातक आहे तेही काही दिवसांत समजेल.

### प्रतिबंध म्हणून काय काळजी घ्यावी?

भारतीय आरोग्य सेवांचे महासंचालक डॉक्टर अतुल गोयल यांच्या मते, एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग असलेली व्यक्ती किंवा एखाद्याला सर्दी असेल तर त्याच्यापासून दूर राहा. खोकताना-शिंकताना तोंडावर रुमाल किंवा कापड ठेवा. त्यासाठी वेगळा रुमाल किंवा टॉवेल वापरा. काही तासांनी ते साबणाने स्वच्छ धुवा. सर्दी-खोकला असेल तर मास्क परिधान करा आणि घरीच आराम करा.

एचएमपीव्ही विषाणूसंबंधी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून नागरिकांना मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन डॉक्टरांनी केलं आहे. प्रतिबंधात्मक उपाय व सतर्कतेचा एक भाग म्हणून नागरिकांनी खोकताना किंवा शिंकताना तोंड व नाक रुमालाने नाक व तोंड झाकण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे. साबण आणि पाण्याने किंवा सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुणे, ताप तसं खोकला आणि शिंका अथवा सर्दी पडश्या सारखे लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन रुग्णांनी सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहावे व वैद्यकीय सल्यानुसार औषधं घ्यावीत. भरपूर पाणी पिणे आणि पौष्टिक आहाराचे सेवन करावं. यामुळे रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल. वैद्यकीय शिक्षण विभागाने विशेष करून संशयित रुग्णांपासून दूर राहून सदर रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होईल असंही डॉक्टरांकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

श्वास लागणे, सतत खोकला, नाक गळणे, ताप येणे, घसा खवखवणे ही लक्षणे असून हा ब्राँकायटिस आणि न्यूमोनिया देखील असू शकतो, असेही तज्ज्ञांचे मत आहे.

### एचएमपीव्हीचा धोका कोणाला?

हा व्हायरस गंभीर संसर्गास कारणीभूत ठरू शकतो, विशेषतः लहान मुलं, वृद्ध लोक आणि रोगप्रतिकारशक्ती कमकुवत असलेल्या लोकांना याचा जास्त धोका आहे. बहुतेक लोकांना खोकला आणि सर्दीसारखे वाटतं. केंद्र सरकारने याबाबत एक ॲडव्हायजरी जारी केली असून, याला घाबरण्याची गरज नाही आणि राज्य सरकारांनीही सतर्क राहावं, असं म्हटलं आहे.

चीनमध्ये हाहाकार माजवणारा एचएमपीव्ही व्हायरस आता भारतात पोहोचला आहे. कर्नाटक, गुजरात आणि तामिळनाडूनंतर आता महाराष्ट्रातही या व्हायरसने प्रवेश केला आहे. नागपुरात दोन मुलांना एचएमपीव्ही व्हायरसची लागण झाल्याचं आढळून आलं असून, देशभरातील एकूण रुग्णांची संख्या ७ झाली आहे. मुंबईतही एक रुग्ण सापडल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

## चर्चा आजची

# हुल्लडबाज चालकांना वेळीच रोखणे गरजेचे

**संतोष राऊळ**

रायगड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा जिल्हा म्हणून नावारूपाला येत आहे. यातच अलिबाग तालुक्यासह मुरूड तालुका पर्यटनासाठी जगप्रसिद्ध होत आहे. येथे मुंबई-पुण्यासह इतर जिल्ह्यांतून तसेच देशभरातून पर्यटक येत असतात. काही पर्यटक आपल्या खासजी वाहनाने तर काही सार्वजनिक वाहनांमधून येथ पर्यंत पोहोचत असतात. परंतु, काही हुल्लडबाज पर्यटकांमुळे येथील पर्यटनाला गालबोट लागतय की काय? अशी चर्चा सध्या येथील जनसामान्यांत रंगू लागली आहे.

नुकतेच अलिबाग तालुक्यातील चौल येथे एका अपघाताची घटना घडली होती. एका स्थानिक उद्योजकाच्या टेम्पोला नाशिक येथील पर्यटकांच्या कारने जोरदार धडक दिली होती. ही कार एक महिला पर्यटक चालवत असल्याचे टेम्पो चालकाकडून सांगण्यात आले होते. यादरम्यान, अलिबाग-चौल या मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी निर्माण झाली होती. यात पर्यटक चालकाची चुकी असून देखील त्यांनी टेम्पो चालकावर अरेरावी करत त्याला व त्याच्या वडीलांना मारहाण केल्याचे प्रत्यक्षदर्शी यांच्याकडून सांगण्यात आले होते. यामुळे, अशा या हुल्लडबाज पर्यटकांवर स्थानिकांकडून प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. पर्यटकांच्या चुकीमुळे पर्यटन स्थळ बदनाम होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

काही महिन्यांपासून अलिबाग-मुरूड या महामार्गावर अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. काही महिन्यांपूर्वी नवेदरबेली आणि आक्षी दरम्यान एका वळणावर दोन एसटी बसेसची समोरासमोर धडक झाली होती. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवीतहानी झाली नव्हती. मात्र, एसटीचालक आणि काही प्रावसी जखमी झाले होते. तसेच, दोन्ही बसेसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या अपघातात कोणाची चुकी हे महत्वाचे नसुन चालकाने भान ठेऊन आणि परिस्थिती पाहून वाहन चालविले पाहिजे. अशी चर्चा प्रवासी वर्गाकडून होत होती.

यानंतर काही दिवसांपूर्वी अलिबागच्या दिशेने एक वीजेवर चालणारी दुचाकी घेऊन चालक जात असताना आक्षी पुलानजिक त्याचा भीषण अपघात झाला. त्याला एका कारने समोरून धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की ती दुचाकी रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खारटात उडाली आणि तिचे दोन तुकडे झाले. सुदैवाने दुचाकीचालक बचावला. परंतु, या अपघातामुळे जनसामान्यांच्या मनांत भीतीचे वातावरण पसरले आहे. यातच पुन्हा आक्षी पुलानजिक एक मुलगी वीजेवर चालणारी दुचाकी घेऊन अलिबागच्या दिशेने पुल उतरून पुढे येत होती. अशातच समोरून येणाऱ्या गाडीमुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने ती दुचाकीसह बाजूच्या खारटात कोसळली. सुदैवाने त्या मुलीला काही लागले नाही. तिच्या दुचाकीचे देखील फारसे नुकसान झाले नाही.

अशीच एक घटना नवेदरबेली जवळ अलिबागकडून रेवदंडाकडे येत असताना गतिरोधकाच्या अलिकडील वळणावर घडली. पनवेलवरून अतिवेगाने आलेला दुचाकीस्वार वळणावरील रस्त्याचा अंदाज न आल्याने थेट खारटात घुसला. यात दुचाकीचालकाच्या सुरक्षिततेमुळे त्याला कोणतीही दुखापत झालेली नाही. मात्र, त्याच्या दुचाकीचे प्रचंड नुकसान झाले. स्थानिकांच्या मदतीने खारटात अडकलेली दुचाकी बाहेर काढण्यात आली. काही स्थानीकांनी त्यांना समजविण्याचा प्रयत्न केला. अशा हुल्लडबाज चालकांना वेळीच रोखले पाहिजे, अशी चर्चा बचाव करणाऱ्या नागरिकांकडून होत होती.

या आधी देखील याच मार्गावर अपघात झालेले आहेत. काहींना प्राणही गमवावा लागला आहे. परंतु, हे अपघात टाळण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही पाऊले उचलली जात नसल्याची चर्चा प्रवासी वर्गात होत आहे. एकतर या मार्गावर काही धोकादायक वळणे आहेत. तसेच, या मार्गावर पुरेसे पथदिवे नसल्याने आणि जे आहेत त्यांचा पुरेसा उजेड पडत नसल्याने सायकलस्वार किंवा पायी चालत जाणाऱ्यांचा अपघात होऊन त्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर दिशादर्शक फलकासह कोठे वळण किंवा गतिरोधक आहेत, कोणत्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता जास्त आहे, त्या ठिकाणी फलक लावावेत. निदान अलिबाग-रेवदंडा मार्गावर जिथे अपघाताची शक्यता जास्त आहे किंवा ज्या ठिकाणी सातत्याने अपघात होत असतात अशा ठिकाणी सुरक्षा कठडे बांधावेत, अशी मागणी स्थानिक तसेच प्रवासी वर्गाकडून होत आहे.

सध्या पर्यटनाचा हंगाम चालु झाला असून मोठ्या प्रमाणात पर्यटकांची रेलचेल सुरू झाली आहे. यात काही हुल्लडबाज पर्यटकांमुळे किंवा रस्ता सुरक्षा संदर्भात प्रशासनाने कोणतीही काळजी न घेतल्यास येथील पर्यटनाला गालबोट लागण्याची, तसेच त्यामुळे पर्यटनावर अवलंबून असणाऱ्यांचा रोजगार बुडण्याची भाती वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे, अशा हुल्लडबाज चालकांना वेळीच रोखणे गरजेचे असल्याच्या चर्चा स्थानिकांमध्ये रंगू लागल्या आहेत.

## लोकसंसद

### जगदीप सिंग यांच पगार ४८ कोटी रुपये

सर्वाधिक पगार घेणाऱ्या सीईओ मध्ये सुंदर पिचाई व मायक्रोसॉफ्ट चे सत्या नडेला यांची आजपर्यंत ख्याती होती पण आता भारतीय वंशाचे जगदीप पुरी यांनी त्यांना मागे टाकत पगाराबाबत नवे विश्व रेकॉर्ड निर्माण केले आहे. क्वान्टमस्केप या कंपनीचे भारतीय वंशाचे संस्थापक व माजी सी इ ओ म्हणून त्यांना दररोज ४८ कोटी रुपये एवढा पगार आहे. याचाच अर्थ त्यांना वार्षिक १७५०० कोटी रुपये पगार मिळता. याशिवाय त्यांच्या पॅकेज मध्ये १९७२६ कोटी रुपयांचे शेअर्स सुद्धा आहेत. एकूणच भारतीयांच्या दृष्टीने ही अभिमानाची व गौरवाची गोष्ट आहे. याबरोबरच एक विचार मनात येतो कि एवढ्या प्रचंड पैशाचे पुरी काय करत असतील? माणसाला खरे तर पैशाचा उपभोग घेतला तरच त्यांचा आनंद घेता येणे शक्य आहे . एवढ्या संपत्तीचा ते काही उपभोग घेऊ शकत नाहीत. माणसाने किती जरी संपत्ती मिळविली तरी त्याचा उपभोग घेतला व जीवनात आनंद घेतला तेवढीच संपत्ती त्यांच्या दृष्टीने महत्वाची असते. बाकीच्या संपत्तीला फारशी किंमत नाही असेच मत अनेकांचे आहे. इतर पैशातून काही देणगी दिल्यास किंवा काही समाज कार्यासाठी खर्च केल्यास त्याचा सुद्धा योग्य उपयोग झाल्यामुळे आनंद होतो एकूणच जास्त पैसे असणे व मिळविणे यामध्ये त्यांचा उपभोग घेतला तरच त्यांचा खऱ्या अर्थाने आनंद आहे.

**शांताराम वाघ पुणे**

### मराठी माणसांचा अस्तित्वाचा प्रश्न

देवपूजा करून घराबाहेर धूप लावण्यावरून झालेल्या किरकोळ वादातून सरकारी अधिकारी असलेल्या परप्रांतीय व्यक्तीने सोसायटीमधील मराठी रहिवाशांना दमदाटी व गुंडांना बोलावून मारहाण केल्याची धक्कादायक घटना कल्याणमधील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये घडली आहे या मारहाणीत अभिजित देशमुख, धीरज देशमुख आणि विजय कविलकट्टे हे जखमी झाले आहेत.कल्याण पश्चिममधील योगीधार परिसरात अजमेरा हाईट्स नावाची इमारत आहे. येथे पीडित मराठी कुटुंबीय आणि अखिलेश शुक्ला हा अधिकारी शेजारी राहतात. अखिलेश शुक्ला यांच्या कुटुंबीयांकडून रोज पूजा केल्यानंतर घराबाहेर धूप जाळण्यात येत असे. या धुपाच्या धुराचा त्रास होत असल्याने कविलकट्टे यांनी अखिलेश शुक्ला यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता. मात्र अखिलेश शुक्ला याने ऐकून न घेता दमदाटी केली. तसेच मराठी माणसं ही घाणेरडी असतात, म्हणून शिव्याशाप दिले.त्यानंतर १० ते १२ जणांच्या टोळक्याला बोलावून कविलकट्टे यांना मारहाण केली. यावेळी अभिजीत देशमुख आणि धीरज देशमुख यांनी मध्ये पडण्याचा प्रयत्न केला असता सदर परप्रांतिय अधिकाऱ्याने त्यांनाही मारहाण केली केल्याचे समोर आले आहे.

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

## दिनविशेष

# प्रवासी भारतीय दिवस

प्रवासी भारतीय दिवस हा ९ जानेवारी रोजी साजरा केला जाणारा वार्षिक उत्सव आहे. या दिवसाला ऐतिहासिक महत्त्व आहे. कारण ९ जानेवारी १९१५ रोजी महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून मुंबईत परतले म्हणून दरवर्षी ९ जानेवारी हा प्रवासी भारतीय दिवस म्हणून साजरा केला जातो.

प्रवासी भारतीय दिवस प्रत्यक्षात २००३ मध्ये स्थापन करण्यात आला होता, परंतु २०१५ मध्ये, त्यात सुधारणा करण्यात आली आणि दर दोन वर्षांनी तो साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रवासी भारतीय दिवस महत्त्वाचा आहे कारण तो केवळ अनिवासी भारतीयांचे (एनआरआय) त्यांच्या मातृभूमीशी संबंध पुन्हा प्रस्थापित करत नाही तर त्यांच्या कर्तृत्वाची कबुली देतो. भारताला त्याच्या विशाल परदेशी डायस्पोराशी जोडण्यासाठी आणि त्यांचे ज्ञान, कौशल्य आणि कौशल्ये एका समान व्यासपीठावर आणण्यासाठी, PBS अधिवेशन - परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा प्रमुख कार्यक्रम २००३ पासून दरवर्षी ७ ते ९ जानेवारी दरम्यान आयोजित केला जातो. प्रवासी भारतीय दिवस अधिवेशन बहुतेक वेळा नवी दिल्ली येथे पार पडले. प्रवासी भारतीय दिवसाचे मुख्य यजमान सहसा परदेशी असतात. परदेशात राहून काम करत असताना भारतीय प्रवासींना भेडसावणाऱ्या आव्हानांना या निमित्ताने ओळखले जाते. हे अनिवासी भारतीयांमध्ये जागतिक नेटवर्क तयार करण्यासाठी आणि तरुण पिढी आणि स्थलांतरित यांच्यातील संबंध वाढवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते. तसेच या दिवसाचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट अनिवासी भारतीयांना त्यांच्या वारसा आणि संस्कृतीची पुन्हा ओळख करून देणे हे आहे.

### प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कार

प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कार (PBS) हा परदेशात राहणाऱ्या भारतीयांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. भारताचे राष्ट्रपती हा सन्मान प्रवासी भारतीय दिवस (PBS) अधिवेशनांचा भाग म्हणून देतात. प्रादेशिक प्रवासी भारतीय दिवस (RPBD) मंत्रालय आपल्या बहुसंख्य डायस्पोरापर्यंत पोहोचण्यासाठी प्रादेशिक प्रवासी भारतीय दिवस परिषदा (RPBD) आयोजित करत आहे, जे विविध कारणांमुळे भारतातील मुख्य द्विवार्षिक कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नाहीत आणि त्यांच्या विचारमंथनाचा लाभ घेऊ शकत नाहीत. हे असे कार्यक्रम प्रादेशिक पातळीवर आयोजित करण्याच्या जोरदार आणि सततच्या मागणीला प्रतिसाद म्हणून आहे. त्यांना भारतीय डायस्पोरा आणि स्थानिक सरकारांकडून उत्साही पाठिंबा मिळाला आहे आणि ते खूप यशस्वी झाले आहेत. आतापर्यंत दहा RPBD आयोजित करण्यात आले आहेत.

### परदेशी भारतीयांशी संबंधित योजना

परदेशात राहणाऱ्या भारतीयांशी संबंधित भारत सरकारच्या काही योजनांमध्ये प्रवासी कौशल विकास योजना (झघतध), डायस्पोरा चिल्ड्रन (SPDC) साठी शिष्यवृत्ती कार्यक्रम, द नो इंडिया प्रोग्राम (KIP), इमिग्रेशन सिस्टम, त-गठ-(व्हिजिटिंग डव्हान्स्ड जॉईंट रिसर्च फॅकल्टी) हे सर्व समाविष्ट आहे.

# न्हावा-शेवामध्ये ३१ हजार वाहनांवर कारवाई

**||तीन कोटींपैकी ४५ लाखांचा दंड वसूल**

**||जानेवारी ते डिसेंबर २०२४ कालावधी**

**| उरण | वार्ताहर |**

न्हावा शेवा वाहतूक शाखेच्यावतीने रहदारीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांना जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत मोटर वाहन कायद्याखाली एकूण ३१,६०० वाहन चालकाविरुद्ध विविध कलमाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित वाहन चालकांना एकूण २ कोटी ८८ लाख ३३ हजार इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला असून सदर दंडा पैकी एकूण ४४ लाख ६६ हजार ७०० इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आल्याची माहिती न्हावा-शेवा वाहतूक शाखेकडून देण्यात आली आहे.




सदर कारवाई अंतर्गत रस्त्यावर चुकीच्या ठिकाणी वाहने पार्क करून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या १४ हजार ४५० वाहन चालकांविरुद्ध, विदाऊट हेल्मेट दुचाकी वाहन चालवणाऱ्या ९ हजार ५८५ चालकांविरुद्ध, चार चाकी वाहन चालविताना सीट बेल्ट न वापरलेल्या ३ हजार १२५ वाहन चालकांविरुद्ध, तसेच लाल सिग्नल तोडणाऱ्या ९५० वाहन चालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

न्हावा-शेवा वाहतूक शाखेच्यावतीने संपूर्ण उलवे व जेएनपीटी परिसरात विशेष नाकाबंदी व तपासणी मोहीम आखण्यात आली असून कोणत्याही वाहनचालकाने मद्यप्राशन करून वाहन चालू नये व मद्य प्राशन करून वाहन चालविताना आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध कठोर दंडात्मक कारवाई सोबतच त्यांचे वाहन जप्त अथवा वाहन परवाना निलंबन करण्याची कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे. जेएनपीटी व उलवे परिसरातील वाहन चालकांनी महामार्ग तसेच अंतर्गत रस्त्यावर वाहने चालवताना स्वतःचे व इतरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोटर वाहन कायद्याचे पालन करावे असे आवाहन वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर यांनी केले आहे.

# डोक्यातील भीती घालवणार नायलॉनची जाळी

**डोक्यावर नारळ पडून जयेश गीते यांचा मृत्यूने पर्यटक धास्तावले**

**| मुरुड जंजिरा | वार्ताहर |**

२ दिवसापूर्वी राजपुरी गावातील बोटीवर असणारे तांडेल जयेश पांडुरंग गीते वय ४८ यांचा समुद्र किनारी शहाळी आणण्यासाठी गेले असता अचानक त्यांच्या डोक्यावर नारळ पडल्याने जागीच मृत्यू झाला होता. त्यामुळे मुरुड समुद्रकिनाऱ्याची सुरक्षा काळजीचे कारण बनली आहे. हि घटना शेकडो वर्षांनी घडल्याचे लोक सांगत आहेत परंतु मुरुड पर्यटनसाठी येणारे पर्यटक सर्वात जास्त वेळ या रस्त्यावर नारळाच्या झाडाखाली फिरत असतात. अशी घटना पुन्हा घडू शकते त्यासाठी पालिकेने किनारी रस्त्यावर नारळांच्या झाडांच्या खाली नायलॉन जाळी लावावी, अशी मागणी अनेक पर्यटक करत आहेत. तसेच त्या झाडांची निगा व स्वछता वेळेवर करणे गरजेचे आहे.

नारळाच्या खराब फांद्या, खराब नारळ व उंदरांनी खाल्लेली शहाळी तातडीने काढण्यात यावीत, पोलिसांनी याची पाहणी करून सुर्लक्षेबाबत नियोजन करण्याची गरज आहे. समुद्र किनारी उंच अशी नारळाची असंख्य झाडे आहेत. नारळ कधीच माणसाच्या अंगावर पडत नसल्याचे बोलले जाते. परंतु रविवारी सायंकाळी घडलेल्या घटनेमुळे ही घटना अपवाद ठरली आहे.

मुरुडमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. समुद्र किनारी फिरताना त्यांची सुरक्षा महत्वाची आहे. यासाठी नारळांच्या झाडाखाली नायलॉनची जाळी लावल्यास अपघात घडण्याची शक्यता कमी आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ जानेवारी

१) श्रीम. नलिनी माळवी
वरसोली-अलिबाग
९-०१-१९४७

२) श्रीम. माणिक राऊत
वरसोली, अलिबाग
९-०१-१९४६

३) श्री. चंद्रकांत बागवे
अलिबाग, रायगड
९-०१-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

आदी नवीन सलियन,
वाढदिवस अलिबाग

कै. सुलोचना सिताराम पाटील,
७वे पुण्यस्मरण,
अलिबाग



## दर्पण दिनानिमित्त पत्रकारांची आरोग्य तपासणी

**कर्जत :** आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनाचे औचित्य साधून भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलच्यावतीने कर्जत तालुक्यातील पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला मेडिकल कॉलेजचे डीन विनायक सबनीस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर कॉलेजचे सीईओ कुशाग्र पटेल, महेश काशीद, ॲड. रमाकांत तरे, रायगड प्रेस क्लबचे उपाध्यक्ष संजय मोहिते, कर्जत प्रेस क्लब अध्यक्ष ॲड . राहुल देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

मेडिकल कॉलेजचे डिन विनायक सबनीस यांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेला पत्रकार हा दिवस-रात्र आपले कर्तव्य पार पाडत असतो. या धावपळीत आपल्या आरोग्याकडे नेहमी दुर्लक्ष होत असते. त्यांचे आरोग्य उत्तम राहावे. या उद्दात हेतूने हे आरोग्य शिबिर भरविण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा गावंडे यांनी केले.

पत्रकारांची आरोग्य तपासणी रायगड हॉस्पिटलमध्ये करण्यात आली. या आरोग्य शिबिरात रक्त तपासणी, ईसीजी, एक्सरे, नेत्र तपासणी, सोनोग्राफी, फिजिओ थेरेपी अशा विविध तापसण्या करण्यात आल्या. यावेळी रायगड हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टरांनी विशेष सहकार्य केले. संघटनेकडून मानपत्र, तुळशीची रोप देऊन डॉक्टरांचा सन्मान केला. दर्वेश पालकर, विलास श्रीखंडे, सचिव दीपक पाटील, अजय गायकवाड, संजय अभंगे, कांता हाबळे, गणेश मते, दिनेश सुतार, मल्हार पवार, अन्य उपस्थित होते.

# रातवड विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

**| माणगाव | वार्ताहर |**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात शाळांतर्गत कल्पकतेतून कृतीकडे आविष्कार २०२४-२५ विज्ञान प्रदर्शन मंगळवारी ७ जानेवारी रोजी उत्साहात संपन्न झाले.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन पोस्को सामाजिक उत्तरदायित्व विभाग सहायक आसावरी काळे, चेरीझन फाऊंडेशनचे उपाध्यक्ष सुमित काळे, मार्केटिंग हेड सल्लागार राकेश पडवळ, शाळेचे मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले.




प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे वैज्ञानिक प्रयोग सादर करून प्रतिकृतींची माहिती दिली. सदर विज्ञान प्रदर्शनात सौर ऊर्जा, औषधी वनस्पती, बायोगॅस, पवन ऊर्जा, पाणी शुद्धीकरण आदी विविध प्रतिकृतीतून विद्यार्थ्यांनी माहितीपूर्ण सादरीकरण केले.

प्रदर्शनामध्ये इयत्ता पाचवीमध्ये प्रकाश संश्लेषण- समृद्धी संदीप पवार प्रथम क्रमांक, सूर्यमाला द्वितीय क्रमांक- दुर्वेश दीपक कदम, इयत्ता सहावीमध्ये गोबरगॅस- अमृता देवकर प्रथम क्रमांक, प्लास्टिक पुनर्वापर- रुद्र अमोल जाधव, द्वितीय क्रमांक, इयत्ता सातवीमध्ये औषधी वनस्पती-दिया साठम प्रथम क्रमांक, औषधी वनस्पती-श्रवण शिर्के द्वितीय क्रमांक, इयत्ता आठवीमध्ये हरित ऊर्जा- पार्थ सुतार प्रथम क्रमांक, संगीतमय विज्ञान-आस्था कोंडे द्वितीय क्रमांक, इयत्ता नववीमध्ये नैसर्गिक शेती- संस्कृती केतन प्रथम क्रमांक, जलशुद्धीकरण- दयाराम कदम, द्वितीय क्रमांक इयत्ता दहावीमध्ये अपारंपारिक ऊर्जा स्तोत्र-मानसी सुतार प्रथम क्रमांक, पूनरप्रक्रिया व पुनर्वापर -नियती शिर्के, कार्तिकी विकास यादव द्वितीय क्रमांक प्राप्त केला. सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले . या प्रतिकृतीतून प्रथम क्रमांकाच्या प्रतिकृती या विभाग स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विज्ञान शिक्षक राजेंद्र भगत यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. या विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण विज्ञान शिक्षक प्रदिप दिवकर व काकासाहेब पवार यांनी केले. अत्यंत उत्साहात विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले.

दरम्यान, विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचा आत्म विश्वास द्विगुणीत झाल्याची धारणा शिक्षकांनी बोलून दाखवली.

# डॉ. सुभाष म्हात्रे यांना कुलाबा जीवन गौरव पुरस्कार २०२५

**| आगरदांडा | वार्ताहर |**

भाई जगताप मित्र मंडळ, मा.आमदार मधुशेठ ठाकुर ट्रस्ट व राजा शिवछत्रपती व ए.पी.जे.अब्दुल कलाम मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रिडा, पत्रकार व वैद्यकीय या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना 'कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार' दिला जातो. यंदाचा पुरस्कार मुरुड वसंतराव नाईक महाविद्यालयाचे डॉ.सुभाष म्हात्रे यांना मिळाला असुन त्यांना सातीर्जे अलिबाग येथील प्रांगणात आमदार भाई जगताप यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी आमदार भाई जगताप, आमदार रविंद्र धंगेकर, आमदार हेमंतदादा ओगले, राजा ठाकूर, ॲड. प्रविण ठाकुर, संतोष चौधरी, उमेश ठाकूर आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

मुरूड वसंतराव नाईक महाविद्यालयाचे डॉ. सुभाष म्हात्रे यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरीमुळे समाजाची सर्वश्रेष्ठ सेवा करुन सामाजिक हिताची जोपासना केली आहे. त्यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्यस्तरीय परिषदामध्ये २७ शोधनिबंधांचे वाचन प्रसिध्द केले आहे. जंजिरा संस्थानचा इतिहास पुस्तक प्रकाशन केले आहे. त्याबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे ते काम करत आहेत. या अमुल्य कामगिरी बद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आला आहे.

# खड्ड्यात दुचाकीस्वार पडला, किरकोळ जखमी

**बेकायदा खोदकाम बांधकाम विभाग रोखणार का ?**

**| नेरळ | वार्ताहर |**

कळंब नेरळ माथेरान राज्य मार्ग रस्त्याच्या बाजूला असलेल्या साईड पट्ट्या खोदून त्यात केबल टाकल्या जात आहेत. या केबलसाठी बेकायदा रस्ते खोदले जात असुन रात्री एक दुचाकीस्वार त्या खड्ड्यात आपल्या गाडीसह कोसळला. त्यामध्ये तो किरकाळ जखमी झाला. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभाग अशा खोदकाम करणाऱ्यांवर कारवाई करणार आहे काय? असा प्रश्न दुचाकीस्वार यांनी उपस्थित केला आहे.



नेरळ कळंब राज्य मार्गावरील वरई ते पोही दरम्यान रस्त्याच्या बाजूला एका खाजगी कंपनीचे लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. या रस्त्याच्या बाजूला साईड पट्टी खोदून त्यात लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. मात्र हे काम करत असताना संबंधित ठेकेदाराने कोणतीच खबरदारी घेतली नाही. काम सुरु असताना कोणत्याही प्रकारचे सूचना फलक लावलेले नाहीत. तसेच हे काम करत असताना खड्डे खोदून माती दगड पूर्ण रस्त्यावर आले आहेत. त्यामुळे वाहन चालकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्यावर दिवसभर वाहनांची खूप वर्दळ असते. कळंब, वारे ओलमन परिसरातील नागरिक या मार्गांवरून प्रवास करत असतात. मंगळवारी रात्री ८ च्या सुमारास बोरगाव गावातील युवक सतीश पाटील हा दुचाकी वरून घरी परत असताना पोशीर गावाच्या पुढे रस्त्याच्या कडेला खोदून ठेवलेल्या खड्यात गाडी कोसळून अपघात झाला. या अपघातामध्ये ते बचावले आहेत.

# हुशारीचा टक्का वाढवण्यासाठी शिक्षकांचा प्रयत्न

**● संतोष दौंड यांचा अनोखा उपक्रम**

**| नेरळ | वार्ताहर |**

कर्जत तालुक्यातील २५ टक्के विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले पाहिजेत. यासाठी जुलै महिन्यापासून अतिरिक्त वर्ग घेण्याचे नियोजन राबविले जात असून विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन टेस्ट घेण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी हा अनोखा उपक्रम सुरु केला आहे. त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.



तालुक्यात इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी असंख्य विद्यार्थी आपली नोंदणी करतात. मात्र, शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण होऊन आणि शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जेमतेम असते. कर्जत तालुक्यात यावर्षी इयत्ता पाचवी आणि आठवी या पूर्व प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १०७८ विद्यार्थ्यांनी आपले अर्ज सादर केले आहेत. त्यात रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५२० इतकी असून तालुक्यातील २२२ शाळांमधील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा देत आहेत. गतवर्षी कर्जत तालुक्यातील केवळ ११ टक्के विद्यार्थी परीक्षेत यशस्वी झाले होते. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शिकविणारे शिक्षक यांनी देखील आपल्या विभागाच्या प्रमुख्याच्या माध्यमातून देण्यात आलेले टार्गेट स्वीकारले आहे.

तालुक्यात ठराविक ठिकाणी शिष्यवृत्ती परीक्षा देणार असलेल्या या सर्व विद्यार्थ्यंसाठी विशेष वर्ग घेतले जात आहेत.

**जगद्गुरु श्री नरेंद्र महाराज संस्थान**

# रक्तदान शिबिराला नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद

**| चणेरा | वार्ताहर |**

जगद्गुरु श्री नरेंद्र महाराज संस्थान नाणिजधाम, रत्नागिरी यांचा लाखो लोकांना घडविण्याचे, समाज उद्धारक कार्य सुरु आहे. तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा या घोषवाक्याचा समाजकार्यात सहभागी करुन महाराष्ट्रातील रक्त पुरवठा संकल्पना विचारात घेऊन याही वर्षी पुर्ण महाराष्ट्रात ४ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ या पंधरवड्यात रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे.



कमीत कमी एक लाख रक्त पिशव्या जमा करण्याच्या संकल्पनेच्या अनुशंगाने फक्त ४, ५ व ६ जानेवारीपर्यंतच ३०६ रक्तदान बुथवर ३५ हजार ३२९ रक्त पिशव्या संकलन झाल्या आहेत. याच संकल्पनेतून स्व स्वरुप संप्रदाय रोहा तालुका सेवा समितीने रोहा येथे ४ जानेवारी, चणेरा येथे ७ जानेवारीला शिबीर घेतले होते. तर नागोठणे येथे १२ व कोलाड येथे १९ जानेवारी रोजी शिबिर आयोजित केले आहे. कुणबी समाज कार्यालय चणेरा येथे १०६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी रमेश पारंगे, दिलीप म्हात्रे, कुमार पवार, रोहन सुतार, मिननाथ कटोरे आदी उपस्थित होते.

# खालापूर पोलीस ठाण्यात पत्रकार दिन साजरा

**| वावोशी | वार्ताहर |**

आद्य मराठी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त खालापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी खालापूर तालुक्यातील सर्व पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांचे औक्षण करून पुष्पगुच्छ, श्रीफळ आणि वस्तुरुपी भेट देऊन सन्मान करण्यात आला. पत्रकार आणि पोलीस यांचे संबंध सहकार्य, परस्पर आदर आणि व्यावसायिक नैतिकतेवर आधारित असायला हवेत. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पत्रकार आणि पोलिसांमधील विश्वासार्हतेचे नाते महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन करीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले.





# शिक्षकांचा सत्कार

**| माथेरान | वार्ताहर |**

पंचायत समिती शिक्षण विभागाच्यावतीने माथेरान व्हॅली इंग्लिश स्कूल वंजारपाडा येथील मैदानावर तालुकास्तरीय शिक्षक क्रिडा स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये धावणे, कबड्डी, गोळा फेक, थाळी फेक, लांब उडी अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या उपक्रमास रा. जि.प. प्रभारी शिक्षणाधिकारी भोपळे उपस्थित होते. विजेत्यांना गट शिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देवून सन्मानित केले.

वैजनाथ केंद्राची ५ जानेवारी २०२५ रोजी गौळवाडी शाळेत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी महिला कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या केंद्राचे केंद्रप्रमुख नारायण सोनवणे यांनी केंद्राच्यावतीने केंद्रातल्या महिला शिक्षकांचा सत्कार केला.

सविता बोराडे, सानिका हांडे, अर्चना शिंदे, वसुधा आंधळकर, वैशाली बांगर, संगीता खाडे, नीता वझरेकर, दर्शना वाडीले, अर्चना देशमुख यांच्यासह अन्य शिक्षकांचा समावेश आहे. नितीन थोरात तंत्रस्नेही शिक्षक, मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद आणि मान्यवर या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पुणे, जेजुरी सहलीचा लुटला मनमुराद आनंद | जुन्या नव्या आठवणींना दिला उजाळा**

# शिक्षकांचा यळकोट यळकोट जय मल्हार

**| माणगाव | वार्ताहर |**

उतेखोल केंद्रातील शिक्षकांची केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार ७ जानेवारी २०२५ रोजी काढण्यात आलेल्या एकदिवसीय पुणे, जेजुरी सहलीचा शिक्षकांनी मनमुराद आनंद लुटला. या सहलीत शिक्षकांनी आपल्या जुन्या, नव्या आठवणींना उजाळा देत विविध स्थळांची पाहणी करीत स्नेह भोजनाचा एकत्रित आस्वाद घेत मौजमजा केली.



या सहलीत केंद्रप्रमुख शंकर शिंदे, अस्मिता खडतर, पूर्वा येलवे, निलिमा गायकवाड, सुनिता पिंगळे, सुधा साळवी, नंदिनी वाले, मधुरा वेदपाठक, सुदर्शन वाघोरकर, वनिता डोळस, केशरबाई सानप, रितिका गोसावी, स्नेहल उतेकर, नेहा मोरे, पूजा उभारे, रमेश उभारे, दिनेश खडतर, गोरक्ष घोडे आदी शिक्षक बंधू-भगिनी उत्साहात सहभागी झाले होते.

आपल्या रोजच्या शैक्षणिक कामात व्यस्त असणारे शिक्षक बंधू-भगिनी यांनी वर्षातून एकदा थोडासा विरंगुळा मिळावा म्हणून माणगाव उतेखोल केंद्रातील शिक्षकांनी पुणे, जेजुरी या ठिकाणी सहलीचे आयोजन केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. मंगळवारी पहाटे साडेचार वाजता माणगाव येथून खाजगी बसने या शिक्षकांची सहल ताम्हिणीमार्गे पुणे जिल्ह्याकडे रवाना झाली. प्रवासादरम्यान ताम्हाणे घाटातील विविध निसर्गरम्य विलोभनीय दृश्यांचा तसेच खोल दरीचा आनंद शिक्षक बंधू-भगिनींनी बसमधून घेतला. त्यानंतर पुणे जिल्ह्यात या शिक्षकांची सहल पोहचल्यावर शिक्षकांनी पुणे जेजुरी, नारायणपूर, प्रति बालाजी, कात्रज सर्पोद्यान, प्राणी आणि पक्षी संग्रहालय आदी स्थळांना भेट दिली. सर्वांनी सहलीचा मनमुराद आनंद घेतला. त्यानंतर मंगळवारी रात्री माणगाव मुक्कामी येऊन सहलीची शिक्षक बंधू-भगिनींनी उत्साहात सांगता केली.

## निवडक



### प्रश्नमंजुषा स्पर्धेत चिखलपचे वर्चस्व

**म्हसळा :** नुकत्याच संपन्न झालेल्या ५२ व्या म्हसळा तालुका विज्ञान प्रदर्शनात प्रतिकृती आणि हर घर संविधान प्रश्नमंजुषा स्पर्धेत चिखलप केंद्राने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखविले आहे. यावेळी, विद्यार्थी प्रतिकृती (विज्ञान मॉडेल) इ. ६वी ते ८वीच्या गटात रा.जि.प. केंद्रीय चिखलप शाळेतील इ. ६वीची विद्यार्थीनी श्रावणी निर्मळ व इयत्ता ८वीचा विद्यार्थी अथर्व शिर्के यांचा तालुक्यात तृतीय क्रमांक आला आहे. तसेच, विज्ञान प्रदर्शनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'हर घर संविधान प्रश्नमंजुषा' स्पर्धेत तालुक्यातील एकूण ११ केंद्रातील २२ शिक्षकांनी सहभाग घेतला. त्यामध्ये चिखलप शाळेतील विष्णू मिसे आणि देवघर कोंड शाळेतील देवेंद्र मुळे यांनी तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तहसीलदार सचिन खाडे यांनी यशस्वी स्पर्धकांचे शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे. यावेळी, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन समीर बनकर, गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, विस्तार मोरे, बशीर उलडे, हर्षल सूर्यवंशी, सावन घोडमारे, दयानंद बरफ, मुख्याध्यापक महादेव पवार, सर्व केंद्रप्रमुख आदी मान्यवर उपस्थित होते.



### आवरे येथे व्याख्यान संपन्न

**चिरनेर :** एस.के. महाविद्यालय सिवूड सायन्स आणि कॉमर्स कॅम्प अंतर्गत आवरे येथील भोलेनाथ मंदिरात 'स्वच्छ भारत सुंदर भारत' या विषयावर नुकतेच व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दैनंदिन जीवनातील परिस्थिती पाहता लोकांनी कचरा व्यवस्थापन तसेच स्वछतेचे नियम पाळले तर मानवी जीवन निरोगी राहू शकते. यामध्ये प्रामुख्याने मलविसर्जनाची स्वतंत्र सोय, साफसफाई, स्वच्छता, मानवी घनकचऱ्याचे व्यवस्थापन या गोष्टी महत्त्वाच्या असून त्या पाळणे अत्यंत गरजेचे आहे, असा सल्ला यावेळी मान्यवरांनी व्याख्यानातून कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दिला आहे. यावेळी, नागेंद्र म्हात्रे, निवास गावंड, सचिन पाटील, अर्चना सिंग, सृजल धुमाळ, जित म्हात्रे, अविनाश राजपूत, आविष्कार पतील आणि शिबिरातील सर्व शिबिरार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन निवास गावंड तर निहरिका शिंदे हिने आभार व्यक्त केले.



### रांजणपाडा ते शिर्डी पालखी सोहळा

**खारेपाट :** अलिबाग तालुक्यातील श्री साई धाम पालखी पदयात्रा सेवा संस्था रांजणपाडा-आवासतर्फे सोमवारी (दि.६) रांजणपाडा ते शिर्डी पदयात्रेला सुरूवात करण्यात आली आहे. या पालखी सोहळ्याला पंचक्रोशीतील भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभला. मंडळाचे हे बारावे वर्ष असून गेले अनेक वर्ष मंडळाचे अध्यक्ष बंटी वाकडे, पदाधिकारी शरद थळे, आशिष शिरगावकर, संतोष म्हात्रे, संजय पाटील, धर्मा कोळी व मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे मोलाचे कार्य या पालखी सोहळ्याला लाभत असते. यावेळी, पालखीचा शुभारंभ वाद्यांच्या गजरात व फुलांचा वर्षाव करत उत्साहात करण्यात आला. रांजणपाडा ते शिर्डी मार्गावरील अनेक ठिकाणी सर्व स्तरातील मान्यवरांनी व भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. दरम्यान, 'साईबाबा की जय' या नामघोषाने परिसर भक्तीमय झाला होता.

#### पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळ कोकणात दाखल

# अलिबागेतील माळरानांत भटकंती सुरू

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळ चारा-पाण्यासाठी कोकणात दाखल झाले आहेत. पुढील सहामहिने कोकणात मुक्काम करून पुन्हा आलेल्या मार्गी आपल्या मुळ गावी प्रस्थान करतील. सध्या अलिबाग तालुक्यातील माळरानांवर आपले बिऱ्हाड घेऊन भटकंती करताना मेंढपाल दिसून येत आहेत. तर, शेतकऱ्यांकडून त्यांना काही पैसे देऊन शेळ्या व मेंढ्या आपल्या शेतात बसविल्या जात आहेत. तसेच, मेंढ्यांची लोकर विकून हातामध्ये चांगले पैसे येत असल्याचे देखील मेंढपालांकडून सांगण्यात येत आहे.**

पुणे-साताऱ्यातील काही दुष्काळग्रस्त भागातून अनेक मेंढपाळ नोव्हेंबरच्या सुमारास, दिवाळीनंतर रायगड जिल्ह्यात दाखल होत असतात. यंदाही अलिबाग तालुक्यातील बेलकडे ते वावे पट्ट्यातील गावांमधील मोकळ्या रानमाळावर मोठ्या प्रमाणात मेंढपाळ दाखल झाले आहेत. त्यांच्या शेळ्या-मेंढ्यांना येथील माळरानावर मुबलब असा चारा-पाणी मिळत आहे. सध्या अलिबाग तालुक्यात दहा ते बारा मेंढपाळ आले असून ते वेगवेगळ्या गावांत आपल्या मेंढ्या चारत आहेत. तसेच, अक्षय तृतीयेनंतर परतीच्या प्रवासात ते पुन्हा एकत्रीत येणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

एक मेंढी सरासरी चार ते पाच हजारात खासगी बाजारात विकली जाते. शिवाय दिडशे ते दोनशे मेंढा बाळगताना २५ ते ३० किलो लोकर विक्री होत असल्याचे मेंढपालांकडून सांगण्यात आले आहे. शिवाय शेतकऱ्यांच्या शेतात मेंढ्या रात्रभर बसविल्यावर खर्ची म्हणून १२५ रुपये अथवा चार ते पाच पायली तांदुळ दिले जातात. मेंढ्यांना रात्रीचे विशेष कवच म्हणून दिमतीला चार ते पाच तगडी कुत्रीही पाळली जातात. एका गावातून दुसऱ्या गावात संसार वाहून नेण्यासाठी घोड्यांचाही वापर केला जात असल्याचे या मेंढपाळांकडून सांगण्यात येत आहे.

> **घाटमाथ्यावरील दुष्काळी भागात पाणी नसल्यामुळे शेती करता येत नाही. त्यामुळे कुटूंबाच्या उदरनिर्वाह करण्यासाठी कोकणात यावे लागते. तसेच, मेंढपालाचा जोड व्यवसाय देखील फायदेशीर पडतो.**
> **- दत्ता शंकर भायगुडे, मेंढपाळ, सातारा**



### उरण कोमसापचे कवी संमेलन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण कोमसाप मधुबन कट्ट्याचे कवी संमेलन उरण येथील विमला तलाव येथे शुक्रवारी (दि.१७) सायंकाळी ५.०० वाजता प्रा. एल.बी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. काव्य संमेलनात देशभक्तीपर विषयांवर काव्यवाचन तसेच क्रांतिवीरांच्या जीवनावर आधारित चारोळ्या सादर होणार आहेत. विशेषतः या काव्य संमेलनाच्या कार्यक्रमात जीव रक्षक बोट कॅप्टन सुनील कोळी आणि समालोचक व निवेदक श्याम ठाकूर यांना मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यासाठी कोमसाप उरणचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, कोमसाप जिल्हा प्रतिनिधी संजय होळकर, कोमसाप उरण कार्याध्यक्षा रंजना केणी, समता ठाकूर, अजय शिवकर आणि सर्व सदस्य या कवी संमेलनाच्या पूर्व तयारीच्या दृष्टीने कामाला लागले आहेत.

## उत्कर्ष समितीकडून पत्रकारांचा सन्मान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पत्रकारदिनाचे औचित्य साधून उत्कर्ष समिती महाराष्ट्र यांच्यावतीने सोमवारी (दि.६) नवीन पनवेल येथील नील हॉस्पिटलमध्ये उरण आणि पेण तालुक्यातील पत्रकारांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला डॉ. शुभदा नील, कांदळवन अधिकारी साईश्वरी पडवळ, डॉ. भाग्यश्री भोईर, ज्ञानेश्वर बर्वे, भक्ती बर्वे, मंगला गडमुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी, कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांनी केले.

यावेळी डॉ. वैभव पाटील यांच्या 'आवाज कोकणचा' या साप्ताहिकाच्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात अनिल कुरघोडे, संजय कदम, दीपक घोसाळकर, निलेश म्हात्रे, मयूर तांबडे, सुधीर पाटील, सुनील कटेकर, आरती पाटील, भरत कुमार कांबळे, धनाजी घरत, जगदीश भोईर, रणीता ठाकूर, सुजाता होळकर या पत्रकारांना बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




### कुसुम पाटील यांचे निधन

**उरण :** केगाव आवेडा येथील कुसुम भास्कर पाटील यांचे (६८) शुक्रवारी (दि.३) निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कुसुम पाटील यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.१२) उरण तालुक्यातील दांडा स्मशानभूमी येथे सकाळी ७ वाजता होणार आहे. तर, दिवसकार्य विधी मंगळवारी (दि.१४) त्यांच्या राहत्या घरी सकाळी १० वाजता होणार आहे.



## पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर



**। रसायनी । वार्ताहर ।**

पत्रकार दिनाचे औचित्य साधून रोहा येथील शासकीय विश्रामगृहात नुकतीच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची बैठक जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीत रोहा तालुक्यातील नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

या बैठकीत रोहा तालुका अध्यक्ष म्हणून किरण मोरे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच, उपाध्यक्षपदी सदेश गायकर, खजिनदारपदी दिनेश मोरे, तर सचिव म्हणून सुरेश पंधरे यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून अनंता म्हसकर, विश्वनाथ कोलते, काशिनाथ बामुगडे, संजय गायकवाड यांची निवड करण्यात आली. यावेळी रोहा तालुका सल्लागारपदी समीर बामुगडे यांची नियुक्ती करण्यात आली. सुधागड तालुक्यातील मंगेश भाई यादव आणि प्रशांत हिगणे यांनीही या बैठकीला उपस्थिती दर्शवली होती.

**■ अध्यक्षपदी किरण मोरे यांची निवड**

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शैलेश पालकर यांनी भूषवले होते. मार्गदर्शन करताना त्यांनी पत्रकारिता करताना तटस्थता आणि सचोटी कशी असावी यावर प्रकाश टाकला. त्यांनी अनेक किस्से सांगत पत्रकारिता क्षेत्रातील अनुभव आणि नैतिकता यावर उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे कोकण कार्याध्यक्ष शैलेश पालकर, रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे, खालापूर उपाध्यक्ष अर्जुन कदम, पनवेल तालुकाध्यक्ष सुनील पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### युवकांसाठी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम

**रायगड :** १२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन म्हणून संपूर्ण राष्ट्रामध्ये साजरा करण्यात येतो. त्यानुषंगाने युवकांच्या विविध गुणांना तसेच कौशल्यांना वाव व प्रोत्साहन मिळावे, यासाठी महाडच्या वीर मुरारबाजी देशपांडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रविवारी (दि.१२) सकाळी ११ वाजता युवकांसाठी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी मान्यवर व्यक्ती तसेच मार्गदर्शन करण्यासाठी यशस्वी उद्योजक आणि व्याख्याते उपस्थित राहणार आहेत.

## वृत्तपत्राचे सामूहिकरीत्या वाचन

**। उरण । वार्ताहर ।**

उरण येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर फुंडे विद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्यावतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी, पत्रकार दिनाच्या निमिताने सर्व पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. तसेच, उपस्थित पत्रकार व विद्यार्थ्यांनी सामूहिकरीत्या वेगवेगळ्या वर्तमानपत्रांचे वाचन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर हे होते. त्यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. पत्रकार आपल्या लेखणीतून समकालीन घडामोडी मांडत असतात, प्रसंगी त्यावर भाष्य करतात आणि प्रस्थापित राजकारणाला आणि समाजकारणाला वेगळी दिशा देऊ शकतात. त्यामुळे पत्रकारांचा सन्मान हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा सन्मान असतो. असे ठक्कर यांनी सांगितले.



## ऊर्जा संरक्षण सप्ताह उत्साहात

**। आपटा । वार्ताहर ।**

बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे नुकतेच रोजी राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण सप्ताहचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहमध्ये कामगार व इतर कर्मचारी वर्गासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात निबंध, चित्रकला, प्रश्नमंजुषा व क्रॉस वर्ड या स्पर्धांचे आयोजन केले गेले होते. त्यांच्या पाल्यांसाठी निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन मोहोपाडा येथे करण्यात आले होते. तसेच, ऊर्जा कार्यक्षमता आणि संवर्धन या विषयावर लोधीवली येथील सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल येथे ऊर्जा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, अमित चिलवे (ऊर्जा मंत्रालय, महाराष्ट्र शासन) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच, बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी रजनेश दत्त, बी.पी. मिश्रा व निलेश जाधव हे उपस्थित होते.



### ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

**पनवेल :** एका ६७ वर्षीय जेष्ठ नागरिकाने घर विक्रीसाठी एका संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी ५ हजार रुपये भरले होते. ती रक्कम परत मिळविण्यसाठी उत्पलकुमार सामंता यांनी हे संकेतस्थळ तपासत असताना त्यांना संबंधित युवतीचा फोन आला. या युवतीने सामंता यांना मोबाईल वरील वेगवेगळे नंबर दाबायला सांगून त्यांच्या बँक खात्यातून १ लाख १६ हजार रुपये इतर खात्यात वळते केले. याबाबत आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



पनवेल महानगरपालिका अंतर्गत महाराष्ट्र सुरक्षा बलचे जवान २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त कवायतीचा सराव सुरू आहे. दरम्यान, सुरक्षा अधिकारी सचिन व्हनमाने सराव घेत आहेत. पनवेलच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानात एकूण ५० जवान सराव करत आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)

#### ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये आयोजन | उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन

# अलिबागेत विधी साक्षरता शिबीर उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय युवा दिन आणि राष्ट्रीय मानवी तस्करी जाणीव दिनानिमित्त ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेज आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमधील लॉ कॉलेजमध्ये विधी साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी (दि.७) झालेल्या या शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय दंड संहिता १८६० आणि भारतीय न्याय संहिता २०२३ यामधील तरतुदींचा फरक समजावून सांगितला आहे. तसेच, कायद्यातील प्रत्येक तरतूद आणि त्यात उल्लेख केलेल्या संज्ञा अत्यंत महत्वाच्या असतात. बदलती समाजव्यवस्था, बदललेले गुन्ह्यांचे स्वरूप आणि कायद्यांची अंमलबजावणी याविषयी देखील माहिती दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणारे गुन्हे, गुन्हेगारांचे प्रकार, बालगुन्हेगार आणि त्याविषयीचे कायदे यामध्ये झालेले बदल याबाबतही माहिती देत कायद्यामधील घटनादुरुस्ती भविष्यामध्ये कश्या फायदेशीर ठरू शकतात याबाबत मोलाचे मार्गदर्शन अमोल शिंदे यांनी केले आहे.

तसेच, जिल्हा विधी प्राधिकरणाचे सदस्य ॲड. पियुष गडे यांनी मानवी तस्करी विषयावर निगडीत भारतीय कायद्यांची माहिती दिली. युवांनी सार्वजनिक भान ठेवत, समाज माध्यमांचा वापर करुन मानवी तस्करी रोखण्यासाठी सहाय्य कसे करता येईल, याबाबत माहिती दिली. तसेच, भारतात मानवी तस्करी रोखण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे आणि तरतूदींविषयी माहिती दिली. अवैध मानवी तस्करी कायदा, बालकामगार कायदा, पोक्सो कायदा आणि बालविवाह प्रतिबंध कायदा याविषयी पियूष गडे यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, सक्रेटरी गौरव पाटील, लॉ कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे आणि आय.क्यु.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ.संदीप घाडगे यांनी देखील मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. निलम म्हात्रे, प्रा. कौशिक बोडस, महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य या शिबिरासाठी उपस्थित होते. प्रा. पियुषा पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. लॉ कॉलेजमधील आय.क्यु.ए.सी. आणि लिगल अँड सर्व्हिसेस समितीमार्फत प्रा. चिन्मय राणे यांनी शिबिराचे आयोजन केले होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- जमिनीची खरेदी व विक्री अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- Vacancy for Office staff in Alibag Interested Graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे वाडीमध्ये कामासाठी माणूस पाहिजे. राहण्याची सोय होईल. पगार १०,०००/- मो. नं.९८२००२९४५८.
- विहिर -आपल्या शेती-वाडीत पाण्याच्या सोईसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाची विहीर करुन घेण्यासाठी संपर्क- रणजित पाटील, सम्राट प्लेटस्, अलिबाग. फोन : ९८८१६३७०४७, ९८३४३०३९४१
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी १२ वी पास/नापास पगार -१२०००/- रुपये महिना, १२ तास ड्युटी ठिकाण-बामणसुरे, चोंढी,संपर्क- ९८२३५८५३२१
- ST स्टॅन्ड च्या शेजारी वासुदेव कॉम्प्लेक्स या इमारतीत पहिल्या मजल्यावर ७०० sqft. road touch व्यापारी गाळा भाड्याने देण्याचा आहे. फोन no. 9271432026, 7387516945

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बनवली, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक १. वैभव वसंत पाटील, गोरेगांव, मुंबई, २. सुनिल भाऊ म्हात्रे, वाघोली, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड ३. स्नेहा सौमित्र पाटील, रा. मुलुंड मुंबई यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| वनवली ता. अलिबाग, जि. रायगड | ५३/१ | ०-०९-६० | २-१९ |
| वनवली ता. अलिबाग, जि. रायगड | ५३/२ | ०-२१-०० | ४-१९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ९.१.२०२५

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. किरण दिलीप चव्हाण यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १. सौ. साक्षी सोमनाथ विरले, २. सौ. ज्योत्सना महेश विरले, ३. श्रीम.लक्ष्मी संजय म्हसकर, ४. श्री. दिपेश मल्हारी मसणे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४८ | १/ ब | ०-१३-७० | ०-८४ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात दिवसांचे** आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०९/०१/२०२५.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड.
मो.-९३२५०६००३७.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की :-

आमचे अशिल कर्जत नगरपरिषद कर्जत तर्फे मुख्याधिकारी यांनी खालील नमूद मिळकत ३० मीटर रस्त्याचे आरक्षणाने बाधीत असून सदर मिळकतींचे मालक श्री. छगनलाल तिलोकचंद ओसवाल, रा. कर्जत, जि. रायगड यांचेकडून खरेदी करण्याची असल्याने सदर रस्त्याचे आरक्षणाने बाधीत मिळकतींचा मोबदला जागा मालकास टी.डी.आर. स्वरूपात देण्याचे आमचे अशिल विचाराधीन आहेत .

**मिळकतींचे वर्णनः-**

| मौजे | सर्व्हे नं./हिस्सा नं. | एकूण क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकारणी (रू. पै.) |
|---|---|---|---|
| भिसेगाव, ता. कर्जत, जि.रायगड | १५/५/ ब | ०.११.३० पोट खराबा ०.००.६० ०.११.९० | २.७१ |

वरील मिळकतीं संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारचे गहाण, बक्षीसपत्र, फरोक्त, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, मृत्युपत्र इत्यादी प्रकारचे कोणताही करार केलेले असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवावी.

वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजण्यात येवून सदर मिळकतींचा टी.डी.आर. स्वरूपातील मोबदला जागा मालकांना देवून सदर मिळकतींचे खरेदीखत आमचे अशिल करून घेतील व मागावून आलेली हरकत आमचे अशिल विचारात घेणार नाहीत.

दिनांक : ०८/०१/२०२५

**ॲड. रविकर राघो गायकवाड.**
१२१, नानामास्तर नगर, मुद्रे,
कर्जत, जि. रायगड- ४१०२०१.
मो. ९०४९४३८३८३

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र.अर्ज नोंद क्र.५७/२०२३
आदेश क्र.

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री सचिन मधुकर रसाळ
रा. मु. पो. मुरुड जंजिरा — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत धाकवडे — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की.

१. अर्जदार श्री सचिन मधुकर रसाळ यांचा मुलीचा (साजिरी सचिन रसाळ) जन्म दि. २०/११/२०२१ रोजी धोकवडे ग्रामपंचायत हद्दीतील जननी हेल्थकेअर हॉस्पिटल येथे मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत धोकवडे कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत धोकवडे येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वरसोली यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७/१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. ८/१/२०२५ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारीख : ८/१/२०२५

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान श्री. अजित सखाराम कांडर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड.**

| अनु.नं. | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १) | १४१/२ | ०-०९-९० | ०.०० |
| २) | १४२/१ | ०-७८-५० पो.ख. ०-०२-५० एकूण ०-८१-०० | १.३७ |
| ३) | १४२/४ | ०-७८-५० पो. ख. ०-०२-५० एकूण ०-८१-०० | १.४४ |
| ४) | १४३/१/ड | ०-६५-६० पो.ख. ०-०४-९० एकूण ०-७०-५० | १६.२५ |
| ५) | १४४/१/ब/२ | ०-२६-३० पो.ख. ०-०१-७० एकूण ०-२८-०० | ०.४५ |
| ६) | १४४/१/क/२ | ०-२६-२० पो.ख. ०-०१-८० एकूण ०-२८-०० | ०.४५ |
| ७) | १४४/१/ड/२ | ०-२६-२० पो. ख. ०-०१-८० एकूण ०-२८-०० | ०.४५ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०९/१/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता.कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक हेमंत माधवसींह भाटीया यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ६७ | ४ | ०-२१-५० पो.ख.०-०४-०० ०-२५-५० | ०-८७ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०९/०१/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची बिन शेती जमिन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतींचे विद्यमान मालक यांच्यामध्ये साठेकरार करण्यात आलेला आहे. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | आर.चौ.मी. | आकार रू.पैसे | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, | १६६/१९०/ १९६/१९७/ १९८/१३२ | ४-५०-०० | ४५.०० | पूजा तन्मय शेटये ऐश्वर्या राजेंद्र सोनटक्के |

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०८/०१/२०२५

**ॲड. किशोर म. हजारे**
बी. कॉम. एल. एल. बी.
००१, वैद्यबाग को. ऑप
हौ. सो. कामत आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे मालक १) श्री. वैभव विजय वैद्य, २) श्री. रुपेश विजय वैद्य व ३) मृणालिनी रविंद्र शेळके रा.मु.पो.चौल, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग, जि. रायगड. | २२५२ | ०-०५-८० पो.ख. ०-००-२० एकूण ०-०६-०० | ३.३७ |

सदरहू मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा)दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकती हया निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दि.०८/०१/२०२५.

**ॲड. प्रथमेश प्र. पोतदार**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ७७६९०८०३३५

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी पुढील कामासाठी खुली ई-निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव:** सीनियर आरईएन/रत्नागिरी विभागांतर्गत हायड्रोलिक रॉक स्प्लिटर मशीनसाठी दुरुस्ती आणि देखभाल करार. **निविदा क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-94. दिनांक 06/01/2024. अंदाजे खर्च:** ₹ 3,75,300/-. **ईएमडी:** ₹ 7,500/-. **ऑनलाईन निविदा जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 30/01/2025 रोजी 15.00 वाजेपर्यंत.** अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी येथे संपर्क साधावा. (वेबसाईट: **https://www.ireps.gov.in**).

## मुरूड जंजिरा नगरपरिषद

लोकमान्य टिळक रस्ता, मुरूड जंजिरा, जि. रायगड,
पिन कोड नं. ४०२४०१ दुरध्वनी क्रमांक ०२१४४-२७४०२२,
ई-मेल आयडी :- co.murudjanjira@gmail.com

### आपली सेवा आमचे कर्तव्य

महाराष्ट्र राज्यातील नागरीकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहीत कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८/०४/२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरीकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालया समोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहीत वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरूद्ध संबंधितांना वरिष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रति प्रकरण रू. ५,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

मुरूड जंजिरा नगरपरिषदेने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यासाठी ५८ सेवा अधिसूचित केल्या असून त्यानुसार नामनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे. त्याचा तपशिल मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात नागरीकांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे.

दिनांक :- ०३/०१/२०२५

सही/-
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे आशिलांनी गाव मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत त्यांचे समोर नमुद मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील अधिकार अभिलेखात खालीलप्रमाणे नमूद असणारी शेती मिळकत**

| भोगवटादार | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| अरविंदर सुखदीप वालीया | ६७ | ५ | ०-०६-१० पो.ख. ०-००-२० | ०.८० |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, कुळ, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, अतिक्रमण वगैर प्रकारचा हक्क हितसंबंध अगर बोजा असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांच्याकडे आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत. असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून उपस्थित होणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कळावे.
ठिकाण: कर्जत
दिनांक ०९/०१/२०२५

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
पत्ता कोर्ट व्हिव बिल्डींग, सदनिका क्रं. १०१
कर्जत दिवाणी न्यायालयासमोर कर्जत रायगड
मो.नं. ९६०४५४५७७७

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्रं.अपिल/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/७६३/२०२४ — दिनांक :- ०२.०१.२०२५

### जाहिर सूचना

प्रति,
१. श्री. सुरेश भाई पोलेकर
२. श्री. शेखर भाई पोलेकर
३. श्री. उदय भाई पोलेकर
४. श्री. शोधन भाई पोलेकर
५. श्री. मकरंद भाई पोलेकर — अर्जदार
६. श्री. प्रशांत भाई पोलेकर
७. श्रीम. शलाका भाई पोलेकर
८. श्रीम. सिंधु भाई पालेकर
रा. दांडा, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

विरूद्ध

१. श्रीम. निशा नंदकुमार पाटील
पूर्वाश्रमीची श्रीम. मोहिनी हरिश्चंद्र पोलेकर,
रा. तरीबंदर रोड, दांडा, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.
२. श्रीम. वृषाली वीरसेन नागवेकर — सामनेवाले
पूर्वाश्रमीची - रोहिणी हरिश्चंद्र पोलेकर,
रा. नवीपेठ, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

विषयः- मा.अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.आरटीएस/अपील क्र.२५/२०२३, दि. १२.०६.२०२३ चे विरुद्ध फेरतपासणी अर्ज.

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल/फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक २२.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास अपिल/फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती-वरकस मिळकती खरेदी घेण्याची बोलणी श्री. अशोक जसराज जैन, श्री. जावेद फौजुल्लहा तापीया, श्री.अझीम फैजुल्लहा तापीया, श्री. अमोल जगदीश कपाडीया ( स्वतः करीता आणि मयत सुशिला जगदीश कपाडीया यांच्या मृत्यूपत्राची अंमलबजावणी करणारा आणि लाभार्थी म्हणून) यांचेबरोबर सुरू केली आहेत. वर नमूद व्यक्तींनी मिळकतींवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ४०३/१ | ०२-०१-७० | २४.३६ |
| ४८७ | ००-५२-०० | ००.९५ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- ०८/०१/२०२५

**ॲड, रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that, at the instruction of our client, we are investigating the title of (1) MR. ASHOK JASRAJ JAIN, residing at 1303 Vashtushilpa, Gamadia Colony, Tardeo, Mumbai-400 007, (2) MR. JAVED FAIZULLAH TAPIA residing at 5th floor, Ashford Apartment, 26 A.B. G. Kher Marg, Malabar Hill, Mumbai-400 006, (3) MR. AZIM FAIZULLAH TAPIA residing at 121 Bennett Villa, 27 Wodehouse Road, Behind Electric House, Colaba, Mumbai-400 039 and (4) MR. AMOL JAGDISH KAPADIA, in his individual capacity and also as the only surviving executor of estate of the late Mrs. Sushila Jagdish Kapadia, residing at 1401, 14th floor, Lodha Costeria, 24, Nepean Sea Road, Malabar Hill, Mumbai - 400 006, to the land described in the First Schedule and the Second Schedule hereunder written ("the said Land").

**THE FIRST SCHEDULE REFERRED HEREINABOVE**

All that piece and parcel of land admeasuring 20,107 square meters bearing Old Gat No. 543 Hissa No. 1 now bearing Gat No. 403/1 of Village Zirad, Taluka, Alibaug. District Raigad and bounded as follows:
On the North: By lands bearing old Survey Nos. 554 and 663 of Village Zirad;
On the South: By lands bearing old Survey Nos. 543/3/2, 538 and 539 of Village Zirad;
On the East: By lands bearing old Survey Nos. 546, 543/2, 544/1,544/2, 543/3/2 of Village Zirad; and
On the West By lands bearing old Survey Nos. 491, 664, 665, 663 of Village Zirad.

**THE SECOND SCHEDULE REFERRED HEREINABOVE**

All that piece and parcel of land admeasuring 5,200 square meters bearing Old Gat No. 663 now bearing Gat No. 487 of Village Zirad, Taluka Alibaug, District Raigad and bounded as follows:
On the North : By land bearing old Survey No. 661 of Village Zirad;
On the South : By lands bearing old Survey Nos. 543/1 and 664 of Village Zirad;
On the East : By lands bearing old Survey Nos. 545 and 543/1 of Village Zirad; and
On the West : By lands Bearing Survey Nos.662 and 665 Village Zirad

Alibag
Date: 08/01/2025

**Adv. Ravindra V. Oak**
"Gurukrupa", Maharshi Karve Road,
At,Po. & Tal. Alibag, Dist. Raigad

## पाहिजेत

खाली नमूद केलेल्या लोकसंचलित साधन केंद्र सीएमआरसीद्वारा सल्लागार म्हणून ११ महिने कालावधी साठी उपजीविका सल्लागार नेमावयाचे आहे. कृपया खालील निकषानुसार पात्र ईच्छुक उमेदवारांनी संबधित सीएमआरसी कडे कार्यालयीन वेळेत दिनांक २०-१-२०२५ पर्यंत अर्ज करावेत. मेलद्वारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**पदाचे नांव** : उपजीविका सल्लागार
**पदांची संख्या** : १ (खाली नमूद लोकसंचलीत साधन केंद्र प्रत्येकी १)
शैक्षणिक अर्हता व अनुभव
कृषी अथवा तत्सम विषयाची पदविका किंवा पदवी
२. संबधित क्षेत्रात कार्यक्षेत्रात काम करण्याचा किमान २ वर्षाचा पदव्युत्तर अनुभव.
३. व्हुचेन प्रकल्प आखणी राबविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.
वयोमर्यादा: ४० वर्षापर्यंत
**संगणक** : MSCIT/तत्सम डिप्लोमा आवश्यक, मायक्रोसॉफ्ट वर्ड/एक्सेल वापरता येणे अत्यावश्यक
**मानधन**: प्रती माह रु.१५०००/- पर्यंत मानधन (नियमानुसार सेवा कर)
अनुभव व पात्रतेनुसार मानधन ठरविण्याचे अधिकार संबधित अध्यक्ष सीएमआरसी यांचकडे राहतील
**अर्ज करण्याचा पत्ता** :पत्ता-प्रगती लोकसंचलीत साधन केंद्र,उगले हाईट बिल्डिंग २ रा माळा, नाकोडा प्लाय वुड दुकानाच्या वर आमराई रोड
कर्जत,जि रायगड फोन नं-७५०७३१३७६३/९६०७०९२१२४ पिन ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. प्रकाश प्रभाकर देशपांडे, रा.४/५, गौरी शंकर पेस्तम सागर कॉलनी, प्लॉट नं. ५० /अ, रोड नं. २, राणे हॉस्पीटलच्या समोर, चेंबुर, मुंबई ४०००८९ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ७१ | १ | ०.२८.१० | १.५७ |
| ७१ | २/ अ | १.१४.९० | ७.३४ |
| ७१ | २ /ब/१ | ०.१६.४० | ०.०० |
| ७१ | २ /ब/ २ | ०.३६.६० | २.३१ |
| ७१ | २/ब/३ | ०.२६.०० | २.०० |
| ७३ | १ | ०.९६.०० | ८.९४ |
| ७३ | २ | ०.३३.६० | २.४४ |
| ७३ | ३ | ०.६२.७० | ५.८१ |
| ७४ | १ | ०.१७.७० | ०.६२ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.


दि. ९/१/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी. एल . एस एल. एल. बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो.नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

# निवडक

## न्यूझीलंडविरुद्धचा पराभव निराशाजनक–युवराज सिंग

**दुबई :** ऑस्ट्रेलियात भारताला पराभव पत्करावा लागला यापेक्षा मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध झालेला ०–३ हा पराभव भारतीय क्रिकेटसाठी सर्वांत निराशाजनक होता, असे मत भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगने व्यक्त केले. या दोन्ही मालिकांत फलंदाजांचे अपयश खूप महत्त्वाचे होते. रोहित शर्मा आणि विराट कोहली या प्रमुख फलंदाजांना दोन्ही मालिकांत चमक दाखवता आली नाही. त्यामुळे दोघांवर चौफेर टीका होत असताना युवराजने मात्र त्यांची पाठराखण केली आहे.



ऑस्ट्रेलियाने नेहमीच आपले वर्चस्व राखले आहे. यापूर्वी आपण त्यांच्यावर मात केली हा इतिहास झाला. त्यानंतरही ऑस्ट्रेलियाने आपला आलेख कायम उंचावला. भारताने मात्र प्रयत्नांची कास सोडली. न्यूझीलंडविरुद्ध आलेले अपयश सर्वात निराशाजनक होते, असे मी पुन्हा पुन्हा सांगेन. पण, रोहित आणि विराटला दोषी धरणे चुकीचे नाही. हे दोन्ही अनुभवी फलंदाज आहेत. त्यांचे योगदान मोठे आहे आणि ते सहजासहजी विसरता येणार नाही. त्यांना यातून बाहेर पडण्यासाठी वेळ देणे गरजेचे आहे, असे युवराज म्हणाला. पराभव पचवण्याची ताकद असायला हवी. चांगले खेळतात तेव्हा कुणी बोलत नाही. पण, वाईट खेळायला लागल्यावर सगळे पुढे येतात. प्रसारमाध्यमे तर वाटच बघत असतात. पण, मी टीका करणार नाही. मी या खेळाडूंचे समर्थनच करेन. खेळाडूंवर टीका करणे सोपे असते, पाठिंबा देणे कठीण असते,'' असे युवराजने सांगितले.

## पनवेलमध्ये दिवस–रात्र क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**रायगड :** पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमीच्यावतीने रसायनी पाताळगंगा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी म ार्केटसच्या मैदानावर गुरवारी ०९ जानेवारी रोजी दिवस–रात्र लेदर बॉल टी–२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत अनय स्पोर्ट्स पनवेल, प्रतिक क्रिकेट अकॅडमी व पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी अशा तीन संघांनी सहभाग घेतला आहे. दिवसा तीन टी–२० चे सामने होणार असून रात्री प्रकाश झोतात दोन सामने खेळवले जाणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन सुरेंद्र जोशी यांच्या हस्ते तर बक्षिस वितरण एक्सपेरिटस इन्शुरन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या असिस्टंट मॅनेजर नीलिमा घुगरे–सरफरे व प्रसिद्ध उद्योजक लावास लुब्रिकांटसचे मालक रोट्रियन रतन खारोल यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना व उपविजेत्या संघाला व स्पर्धेत उत्कृष्ठ कामगीरी करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती पीसीएसएचे सचिव सागर कांबळे यांनी दिली आहे.

## लेकीच्या जन्मानंतर टेनिस स्टारनं तोडलं पार्टनरसोबतचं नातं

**ऑस्ट्रेलिया :** टेनिस जगतातील कामगिरीमुळे चर्चेत असणारी चार वेळची ग्रँडस्लॅम चॅम्पियन नाओमी ओसाका ही वैयक्तिक कारणामुळे चर्चेत आली आहे. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेला अवघे काही दिवस उरले असताना प्रसिद्ध महिला टेनिस स्टारनं पार्टनरपासून वेगळे झाल्याची घोषणा केली आहे. सोशल मीडियावरील एका पोस्टच्या माध्यमातून तिने पार्टन रॅपर कॉर्डे याच्यासोबतच नातं तुटल्याचे सांगितले आहे. नाओमी ओसाका हिने २०१९ आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा जिंकली होती. एवढेच नाही तर तिने दोन वेळा अमेरिकन ओपन स्पर्धाही गाजवली आहे. नाओमी ओसाका आणि कॉर्डे या जोडीनं जुलै २०२३ मध्ये त्यांच्या मुलीचं स्वागत केले होते. नाओमी ओसाका जवळपास १५ महिन्यांच्या ब्रेकनंतर पुन्हा एकदा टेनिस कोर्टवर उतरल्याचे पाहायला मिळाले होते. आता ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेआधी ती सोशल मीडियावरील पोस्टमुळे चर्चेत आली आहे. पार्टनरसंदर्भात खास पोस्ट शेअर करत त्याच्यापासून वेगळे झाल्याची स्टोरी नाओमी ओसाकाने सांगितली आहे. सोशल मीडियावरु जी पोस्ट केलीये त्यात तिने लिहिलंय की, मनात कोणताही वाईट विचार नाही. तो एक चांगला व्यक्ती आणि पिता होता. प्रामाणिकपणे सांगायचं तर आम्ही दोघे एकत्र आलो तो आयुष्यातील खास आणि आनंदी क्षण होता. माझी मुलगी हा माझ्यासाठी मोठा आशिर्वाद आहे. पार्टनरसोबतच्या चांगल्या आठवणींसह लेकीसोबत पुढचा प्रवास करायला सक्षम आहे.



नाओमी ओसाका ही अशी टेनिस स्टार आहे जी ग्रँडस्लॅम स्पर्धेत क्वार्टर फायनल, सेमी किंवा फायनलमध्ये कधीच पराभूत झालेली नाही.

### अमरहिंद मंडळ शालेय कबड्डी स्पर्धा २०२५

# गौरिदत्त मित्तल विद्यालय, एसआयइएस; यांनी पटकावले कबड्डी स्पर्धेचे जेतेपद

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

**गौरिदत्त मित्तल विद्यालय, एसआयइएस यांनी अमरहिंद मंडळाने आयोजित केलेल्या शालेय कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे मुले आणि मुलींच्या गटात विजेतेपद मिळविले. आंध्र हायस्कूलचा राज गुप्ता (मुले) तर डॉ. आंबेडकर हायस्कूलची ईशा डिगे (मुली) स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले. या दोन्ही खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. दादर येथील अमरहिंद मंडळाच्या पटांगणावर झालेल्या मुलांच्या अंतिम सामन्यात सायनच्या गौरिदत्त मित्तल विद्यालयाने चुरशीच्या लढतीत माटुंग्याच्या आंध्र विद्यालयाला ४४–४० असे नमवित या विभागात जेतेपदाला गवसणी घातली. विश्रांतीला २१–२० अशी आघाडी आंध्र विद्यालयाकडे होती.**



आर्यन जाधवच्या चतुरस्त्र खेळाने गौरीमित्तल संघाने आपला विजय साकारला. आंध्र विद्यालयाच्या राज गुप्ताने कडवी लढत दिली. मुलींच्या सामन्यात वडाळाच्या एसआयइएसने विक्रोळीच्या डॉ. आंबेडकर विद्यालयाचा ३७–२० असा सहज पराभव करीत विजेतेपदाचा चषक उंचावीला. स्नेहा पिसाळ हिच्या अष्टपैलू खेळांनी या विजयाची किमया साधली. डॉ. आंबेडकर विद्यालयाकडून ईशा डिगेने उत्कृष्ट खेळ केला.

या अगोदर झालेल्या मुलांच्या उपांत्य सामन्यात गौरिदत्त मित्तलने सोशल सर्व्हिसचा (३५–३३) असा, तर आंध्र हायस्कूलने मारवाडी हायस्कुलचा (३८–३३) असा पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती. मुलींच्या गटात एसआईइएसने सोशल सर्व्हिसला (४५–३३) असे, तर डॉ. आंबेडकर विद्यालयाने आंध्र हायस्कूलला (४२–२९) असे नमवित अंतिम फेरीत धडक दिली होती. मुलांत सोशलसर्व्हिसच्या आर्यन जाधवची आणि गौरिदत्तच्या सतीश शर्माची स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचा खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. मुलींच्या गटात एसआईइएसच्या स्नेहा पिसाळची आणि डॉ. आंबेडकर विद्यालयाची तन्वी कणेकरची स्पर्धेतील अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचा खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. या चारही खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

# एक्सियाटा एरिना स्टेडियमच्या छताला गळती

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

मलेशिया ओपन २०२५ च्या स्पर्धेच्या माध्यमातून बॅडमिंटन नव्या वर्षातील नव्या सत्राचा शुभारंभ झाला आहे. पण भारतीय स्टार शटलरच्या पहिल्याच सामन्यात खेळाडूंना एक विचित्र अनुभव आला. मलेशियाची राजधानी क्वालालंपूर येथील एक्सियाटा एरिना स्टेडियमवर बॅडमिंटनचे मॅचेस खेळवण्यात येत आहे. ७ जानेवारी २०२५ पासून सुरु झालेल्या या स्पर्धेतील पहिल्या दिवशी आयोजकांची फजिती झाली. कारण छतगळतीमुळे सामन्यात आलेला व्यत्यय आणि त्यामुळे मॅच पुढे ढकलण्याचा मुद्दा सध्या चांगलाच चर्चेचा विषय ठरला.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत असा प्रकार होणं म्हणजे हास्यस्पदच आहे. छतगळतीमुळे नव्या वर्षातील पहिली बॅडमिंटन स्पर्धा ज्या स्टेडियमवर खेळवण्यात आली. त्या ठिकाणच्या कोर्ट २ आणि कोर्ट ३ वरील सामन्यात छतगळतीच्या समस्येमुळे खेळात व्यत्यय पाहायला मिळाला.



### भारतीय स्टार शटलरच्या पहिल्याच सामन्यात व्यत्यय

या दोन्ही कोर्टवरील लढती थांबवण्यात आल्या. कोर्ट नंबर ३ वर भारतीय शटलर एचएस प्रणॉय विरुद्ध कॅनडाचा ब्रायन यंग यांच्यातील लढत सुरु होती.

ही लढत छतगळती मुळे थांबवण्यात आलेल्या लढतींपैकी एक आहे. पहिल्या फेरीतील लढतीत भारताच्या प्रणॉय रॉय याने पहिला सेट २१–१२ असा जिंकला होता. दुसऱ्या सेटमध्ये तो ६–३ अशा आघाडीवर असताना ही मॅच शेवटी थांबवण्यात आली. कोर्टवर पाणी जमा झाल्यामुळे अनेकदा ब्रेक घेतल्यावर अखेर सामना पुढच्या दिवशी जिथून थांबला तिथून पुढे खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला. १२.४३ कोटींची बक्षीस मिळणार आहेत.

# मुरुड रिटर्न क्रिकेट संघाने मारली बाजी

**| आगरदांडा | वार्ताहर |**

शिक्षक वर्धापनदिनाचे औचित्य साधून, परहुरपाडा येथील शिवछत्रपती क्रीडांगणावर शिक्षकांच्या भव्य क्रिकेट स्पर्धा संपन्न झाल्या. येथील मुरुड रिटर्न या क्रिकेट संघाने प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळवले. पिकनिक ग्रुप या अलिबागमधील नामांकित शिक्षकग्रुपने शिक्षकांमधील खिलाडूवृत्ती, शारीरिक तंदुरुस्ती आणि एकोपा वाढीच्या हेतूने भव्य क्रिकेटस्पर्धा आयोजित केल्या होत्या.



यामध्ये मुरुड रिटर्न संघाने आपले वर्चस्व सिद्ध करुन प्रथम क्रमांक पटकावला. यामध्ये प्रवीण भगत उत्कृष्ट गोलंदाज ठरले. पिकनिक ग्रुपचे अध्यक्ष नरेंद्र गुरव, अलिबाग गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या हस्ते मुरुड संघाला आकर्षक स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. मुरुडच्या शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये पिकनिक ग्रुपचे उपाध्यक्ष सुनील पाटील, महेश कवळे, जगदीश चवरकर, शुभम शिवणकर,राजेंद्र साळावकर, सुदर्शन महाडिक, गणेश नाखवा, संतोष पुकळे, चेतन पाटील, विश्वास पाटील, महेश भगत, सुनील काळे आदी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रिकेट ऑस्ट्रेलीयाने चूक केली मान्य

**| सिडनी | वृत्तसंस्था |**

भारताचे महान फलंदाज सुनील गावस्कर यांना क्रिकेट ऑस्ट्रेलियाने बॉर्डर–गावस्कर ट्रॉफी सादरीकरणासाठी बोलावले नसल्याबाबत आता दिलगीरी व्यक्त केली आहे. त्यांना त्यांची चूक कळल्याचे त्यांनी सांगितले आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया म्हणाले की, आम्ही मान्य करतो की एलन बॉर्डर आणि सुनील गावस्कर या दोघांना एकत्र स्टेजवर येण्यासाठी आमंत्रित केले असते, तर अधिक योग्य ठरलं असतं.

ऑस्ट्रेलियाने एका दशकाच्या प्रतिक्षेनंतर बॉर्डर गावस्कर ट्रॉफी जिंकली. मालिका संपल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ विजयाच्या जल्लोषात इतका मग्न झाला की त्यांनी महान भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांचा अपमान केला.

भारताविरुद्ध पाच सामन्यांची मालिका जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाला बॉर्डर–गावस्कर ट्रॉफी सादर करण्यासाठी गावस्कर यांना निमंत्रित केले नाही. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने केवळ एलन बॉर्डर यांच्या हस्ते ही ट्रॉफी विजयी संघाला प्रदान केली. भारत–ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेला दोन्ही संघांच्या या दिग्गज खेळाडूंच्या नावावरून बॉर्डर गावस्कर ट्रॉफी हे नाव देण्यात आले. त्यामुळे दोन्ही खेळाडूंच्या हस्ते ट्रॉफी देणे स्वाभाविक गोष्ट होती. पण क्रिकेट ऑस्ट्रेलियाने तसं केलं नाही.

सुनील गावस्कर हे भारत–ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेतील प्रत्येक सामन्यासाठी ऑस्ट्रेलियात उपस्थित होते. सिडनीच्या मैदानावरही प्रेझेंटेशनदरम्यान सुनील गावस्कर हे मैदानावर सीमारेषेबाहेर उभे राहून ऑस्ट्रेलियन संघाला टाळ्या वाजवत अभिनंदन करताना दिसले. स्टार स्पोर्टशी बोलताना गावस्करांनी याबाबत नाराजी दर्शवताना म्हणाले, मला तिथे ट्रॉफीच्या सादरीकरणासाठी स्टेजवर उपस्थित राहण्यासाठी नक्कीच आवडले असते. म्हणजे, मी इथे मैदानावर उपस्थित आहे. सादरीकरणाच्या बाबतीत, ऑस्ट्रेलिया जिंकला याने मला काही फरक पडत नाही. ते चांगले क्रिकेट खेळले आणि त्यामुळे ते जिंकले आहेत. ठीक आहे, फक्त मी भारतीय आहे. म्हणून मी सादरीकरणामध्ये ट्रॉफी देऊ शकलो नाही. माझा मित्र एलन बॉर्डरसह ट्रॉफी सादर करताना मला आनंद झाला असता, असता अशी खंत सुनील गावस्कर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

# रोहित, विराटचे भवितव्य निवड समितीच्या हाती

### भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांचे मत

**| सिडनी | वृत्तसंस्था |**

ऑस्ट्रेलियातील मालिका पराभवात फलंदाजांचे आणि त्यातही रोहित शर्मा, विराट कोहली या प्रमुख खेळाडूंचे अपयश कारणीभूत होते. या दोघांचेही भवितव्य आता पूर्णपणे निवड समितीच्या हातात आहे, असे मत माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले.

ऑस्ट्रेलियात जाण्यापूर्वी सर्व फलंदाज चांगल्या लयीत होते असे नाही. न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मालिकेतही फलंदाजांचे अपयश संघाला भोवले होते. ऑस्ट्रेलियातील पराभवापेक्षा मायदेशात न्यूझीलंडच्या फिरकीसमोर भारताने तीनही कसोटी सामने हरणे ही सर्वात नामुष्कीची गोष्ट होती. तेव्हाही रोहित, विराट लयीत नव्हते. अशा वेळी भारतीय संघाचे दरवाजे



ठोठावणाऱ्या खेळाडूंना योग्य वेळी संधी मिळणार नसेल आणि वरिष्ठ खेळाडूंना वगळण्याचे धाडस नसेल, तर अशी निवड समिती काय कामाची आहे, असा संतप्त प्रश्न गावस्कर यांनी उपस्थित केला. या दोन्ही मालिकांनंतर आता रोहित आणि विराट यांचे भवितव्य अर्थातच निवड समितीच्या हातात आहे. सध्या तरी जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम लढतीच्या वाटेवरून आपल्याला माघारी परतावे लागले आहे. याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे आणि हे निवड समितीने मनावर घ्यावे, असे गावस्कर म्हणाले. या मालिकेतील नऊ डावांत सहा वेळा आपण दोनशे धावाही करू शकलो नाहीत. सहा महिन्यांतील भारतीय फलंदाजीचे अपयश चिंताजनक होते. केवळ यामुळेच जे सामने आपण जिंकायला हवे होते. ते आपण गमावले. आता जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा (डब्ल्यूटीसी) नवा हंगाम सुरू होण्यास पुरेसा वेळ आहे. या वेळात निवड समिती नव्या भारतीय संघाचा विचार करेल, अशी अपेक्षाही गावस्कर यांनी व्यक्त केली. ऑस्ट्रेलियात नितीश कुमाररेड्डीची निवड केली हे योग्यच होते. अनेक खेळाडू सध्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये कामगिरी करत आहेत. त्यांना संधी मिळणे गरजेचे आहे, याकडेही गावस्कर यांनी लक्ष वेधले आहे.

# अलिबागच्या मुलींचा संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी पंजाबला रवाना



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पटियाला पंजाब येथे होणाऱ्या स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया यांनी आयोजित केलेल्या गतका मार्शल आर्ट या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या टीममधून अलिबागच्या सहा मुलींची निवड झाली आहे. यामध्ये वेदिका संतोष कवळे–नवगाव, प्रणाली बाबासाहेब कांबळे–अलिबाग कोळीवाडा, सोनू नरेश कामी–पंतनगर, अलिबाग, मानसी प्रदीप पाटील–सारळ, जिज्ञासा सुधीर पाटील–अलिबाग पेढांबे, अनघा हेमंत पाटील अलिबाग–झिराड या खेळाडूंचा समावेश आहे.

गतका मार्शल आर्ट ऑफ रायगड या संस्थेच्या विद्यार्थिनी आहेत. या संस्थेचे अध्यक्ष संतोष कवळे तसेच माजी सायकलपटू व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अरुण कवळे नवगाव व विद्यार्थ्यांचे पालक, नातेवाईकांनी प्रत्यक्ष अलिबाग एसटी स्टँडवर जाऊन विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धेचे भारतात आयोजन | जगातील टॉप-१० भालाफेकपटू सहभाग घेणार

# नीरज चोप्राच्या स्वप्नांना मिळाले बळ

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

नीरज चोप्राने गेल्या काही वर्षांत भारताला जगभर प्रसिद्धी दिली आहे. नीरजने प्रथम टोकियो ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक आणि नंतर पॅरिसमध्ये रौप्यपदक जिंकून इतिहास रचला होता. आता तो पुन्हा एकदा ऐतिहासिक काम करणार आहे. नीरज नेहमीच आंतरराष्ट्रीय स्तरावरील भालाफेक स्पर्धा भारतात आयोजित करण्याच्या बाजूने राहिला आहे. आता त्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाने आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धेची घोषणा केली आहे. यात जगातील टॉप–१० भालाफेकपटू सहभागी होणार आहेत.


ॲएफआयचे १२ वर्षे अध्यक्ष असलेले आदिल सुमारीवाला यांनी भारतात आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धा आयोजित करण्याबाबत माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, या कार्यक्रमासाठी जगातील दहा सर्वोत्तम भालाफेकपटूंना आमंत्रित केले जाईल. ज्यामध्ये नीरज चोप्रा देखील सहभागी होणार आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे नीरज केवळ स्पर्धेत खेळणार नाही तर त्याच्या संघटनेवरही तो पूर्णपणे देखरेख ठेवणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या संघात तो सामील झाला आहे. ॲएफआयला जेएसडब्ल्यू आणि परदेशी कंपन्यांचे सहकार्य मिळणार आहे. नीरजमुळे भालाफेकीबाबत वाढता उत्साह पाहता हा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील अधिकाधिक तरुणांना या खेळाची माहिती व्हावी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर या खेळात देशाचे प्रतिनिधित्व करता यावे. हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सध्या जगातील सर्वोत्तम भालाफेकपटूंशी स्पर्धा करण्यासाठी डायमंड लीगमधील परदेशी स्पर्धांमध्ये जावे लागते. अशा स्पर्धांमुळे अनुभव मिळण्यास मदत होणार असल्याचे बोलले जाते.

### नवीन अध्यक्ष बहादूर सिंग सागू

**१२ वर्षानंतर ॲएफआयचे अध्यक्ष आदिल सुमारीवाला यांचा कार्यकाळ संपला आहे. आता त्यांच्या जागी २००२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत शॉटपुट स्पर्धेत सुवर्णपदक विजेते बहादूर सिंग सागू यांची नवीन अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. त्याच्या आगमनानंतर, आता भालाफेकखेरीज इतर अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्याचा विचार आहे. मात्र, आदिल सुमारीवाला यांनीच त्याची सुरुवात केली.**
**२०२७ मध्ये वर्ल्ड रिले, २०२८ मध्ये वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिप आणि २०२९ मध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिप आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या सर्व कार्यक्रमांसाठी भारत बोली लावणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.**



नववे पुण्यस्मरण



स्व.रामचंद्र पोसू थळे
मृत्यू दि. : ९ जानेवारी २०१६
मु.पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड
तुमच्या पावन स्मृतींना आमचे विनम्र अभिवादन
आप्पा
तुमची आठवण आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील
शोकाकुल
मुलगा : अजित थळे, सून : आश्विनी थळे, नातू : अद्वैत थळे

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ **संस्थापक–संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)